१३५.	मुंदडा, श्रीमती नमिता अक्षय (कैज)	७	१	८७.५%
१३६.	मुनगंटीवार, श्री. सुधीर सच्चिदानंद (बल्लारपूर)	८	०	१००%
१३७.	मुटकुळे, श्री. तान्हाजी सखारामजी (हिंगोली)	६	२	७५%
१३८.	नाईक, श्री. गणेश (ऐरोली)	७	१	८७.५%
१३९.	नाईक, श्री. इंद्रनिल मनोहर (पुसद)	८	०	१००%
१४०.	नाईक, श्री. मानसिंग फत्तेसिंगराव (शिराळा)	५	३	६२.५%
१४१.	नाईक, श्री. शिरीषकुमार सुरूपसिंग (नवापूर)	८	०	१००%
१४२.	नाईक, श्री. वैभव विजय (कुडाळ)	७	१	८७.५%
१४३.	नार्वेकर, ॲड. राहूल सुरेश (कुलाबा)	५	३	६२.५%

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१४४.	नवघरे, श्री. चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत (बसमत)	७	१	८७.५%
१४५.	निकम, श्री. शेखर गोविंदराव (चिपळूण)	८	०	१००%
१४६.	निकोले, श्री. विनोद भिवा (डहाणू)	८	०	१००%
१४७.	निलंगेकर-पाटील, श्री. संभाजी दिलीपराव (निलंगा)	७	१	८७.५%
१४८.	पाचपुते, श्री. बबनराव भिकाजी (श्रीगोंदा)	५	३	६२.५%
१४९.	पाडवी, श्री. राजेश उदेसिंग (शहादा)	८	०	१००%
१५०.	पारवे, श्री. राजु देवनाथ (उमरेड)	८	०	१००%
१५१.	पटेल, श्री. अमीन (मुंबादेवी)	८	०	१००%
१५२.	पटेल, श्री. राजकुमार दयाराम (मेळघाट)	८	०	१००%
१५३.	पाटील, श्री. अनिल भाईदास (अमळनेर)	८	०	१००%
१५४.	पाटील, श्री. बाबासाहेब मोहनराव (अहमदपूर)	८	०	१००%
१५५.	पाटील, श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू (कोथरुड)	८	०	१००%
१५६.	पाटील, श्री. चंद्रकांत निंबाजी (मुक्ताईनगर)	६	२	७५%
१५७.	पाटील, श्री. चिमणराव रुपचंद (एरंडोल)	७	१	८७.५%
१५८.	पाटील, श्री. किशोर आप्पा (पाचोरा)	८	०	१००%
१५९.	पाटील, श्री. कुणालबाबा रोहिदास (धुळे ग्रामीण)	७	१	८७.५%
१६०.	पाटील (सडोलीकर), श्री. पी.एन. (करवीर)	८	०	१००%

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१६१.	पाटील, श्री. प्रमोद (राजु) रतन (कल्याण ग्रामीण)	७	१	८७.५%
१६२.	पाटील, डॉ. राहुल वेदप्रकाश (परभणी)	४	४	५०%
१६३.	पाटील, श्री. राजेश नरसिंगराव (चंदगड)	८	०	१००%
१६४.	पाटील, श्री. राजेश रघुनाथ (बोईसर)	५	३	६२.५%
१६५.	पाटील, श्री. राणाजगजितसिंह पद्मसिंह (तुळजापूर)	७	१	८७.५%
१६६.	पाटील, श्री. रविशेठ (पेण)	२	६	२५%
१६७.	पाटील, श्री. ऋतुराज संजय (कोल्हापूर दक्षिण)	५	३	६२.५%
१६८.	पाटील, ॲड. शहाजीबापू राजाराम (सांगोले)	२	६	२५%
१६९.	पाटील, श्रीमती सुमनताई आर.आर. (आबा) (तासगाव-कवठे महांकाळ)	८	०	१००%
१७०.	पाटणी, श्री. राजेंद्र सुखानंद (करंजा)	२	६	२५%
१७१.	पटोले, श्री. नानाभाऊ फाल्गुनराव (साकोली)	८	०	१००%
१७२.	पवार, श्री. अभिमन्यु दत्तात्रय (औसा)	८	०	१००%
१७३.	पवार, श्री. अशोक रावसाहेब (शिरुर)	८	०	१००%
१७४.	पवार, श्री. लक्ष्मण माधवराव (गेवराई)	८	०	१००%
१७५.	पवार, श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) (कलवण)	८	०	१००%
१७६.	पवार, श्री. राजेश (नायगांव)	८	०	१००%
१७७.	पवार, श्री. रोहित (कर्जत जामखेड)	८	०	१००%

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१७८.	पावरा, श्री. काशिराम वेचान (शिरपूर)	६	२	७५%
१७९.	फरांदे, श्रीमती देवयानी सुहास (नाशिक मध्य)	८	०	१००%
१८०.	फातर्पेकर, श्री. प्रकाश वैकुंठ (चेंबूर)	८	०	१००%
१८१.	पिंपळे, श्री. हरीष मारोतीआप्पा (मूर्तिजापूर)	८	०	१००%
१८२.	पोतनीस, श्री. संजय गोविंद (कलिना)	७	१	८७.५%
१८३.	प्रभू, श्री. सुनील (दिंडोशी)	८	०	१००%
१८४.	रहांगडाले, श्री. विजय भरतलाल (तिरोरा)	७	१	८७.५%
१८५.	राजाळे, श्रीमती मोनिका राजीव (शेवगाव)	८	०	१००%
१८६.	राजपुत, श्री. उदयसिंग सरदारसिंग (कन्नड)	८	०	१००%
१८७.	राणा, श्री. रवि (बडनेरा)	८	०	१००%
१८८.	राणे, श्री. नितेश नारायण (कणकवली)	८	०	१००%
१८९.	राणे, श्री. सुनील दत्तात्रय (बोरिवली)	८	०	१००%
१९०.	राठोड, श्री. तुषार गोविंद (मुखेड)	६	२	७५%
१९१.	राऊत, श्री. राजेंद्र विठ्ठल (बार्शी)	४	४	५०%
१९२.	राऊत, श्री. सुनिल राजाराम (विक्रोळी)	८	०	१००%
१९३.	रावल, श्री. जयकुमार जितेंद्रसिंह (सिंदखेडा)	८	०	१००%
१९४.	रायमुलकर, श्री. संजय भास्कर (मेहकर)	८	०	१००%
१९५.	सागर, श्री. योगेश (चारकोप)	८	०	१००%

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१९६.	साकोरे-बोर्डीकर, श्रीमती मेघना दिपक (जिंतूर)	८	०	१००%
१९७.	साळवी, श्री. राजन प्रभाकर (राजापूर)	८	०	१००%
१९८.	सरनाईक, श्री. प्रताप बाबुराव (ओवळा-माजीवडा)	८	०	१००%
१९९.	सरवणकर, श्री. सदा (माहिम)	५	३	६२.५%
२००.	ससाने, श्री. नामदेव जयराम (उमरखेड)	८	०	१००%
२०१.	साटम, श्री. अमीत भास्कर (अंधेरी पश्चिम)	७	१	८७.५%
२०२.	सातपुते, श्री. राम विठ्ठल (माळशिरस)	५	३	६२.५%
२०३.	सावे, श्री. अतुल मोरेश्वर (औरंगाबाद पूर्व)	८	०	१००%
२०४.	सावंत, श्री. तानाजी जयवंत (पारंदा)	५	३	६२.५%
२०५.	सावंत, श्री. विक्रमसिंह बाळासाहेब (जत)	८	०	१००%
२०६.	सावरकर, श्री. रणधीर प्रल्हादराव (अकोला पूर्व)	८	०	१००%
२०७.	सावरकर, श्री. टेकचंद श्रावण (कामठी)	७	१	८७.५%
२०८.	सावकारे, श्री. संजय वामन (भुसावळ)	८	०	१००%
२०९.	सेल्वन, कॅप्टन आर तामिल (सायन कोळीवाडा)	६	२	७५%
२१०.	शाह, श्री. फारुक अन्वर (धुळे शहर)	७	१	८७.५%
२११.	शाह, श्री. पराग (घाटकोपर पुर्व)	७	१	८७.५%
२१२.	शेख, श्री. रईस कासम (भिवंडी पुर्व)	८	०	१००%

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२१३.	शर्मा, श्री. गोवर्धन मांगीलाल ऊर्फ लालाजी (अकोला पश्चिम)	१	७	१२.५%
२१४.	शेलार, ॲड. आशिष बाबाजी (वांद्रे पश्चिम)	५	३	६२.५%
२१५.	शेळके, श्री. सुनिल शंकरराव (मावळ)	८	०	१००%
२१६.	शिंदे, श्री. बबनराव विठ्ठलराव (माढा)	२	६	२५%
२१७.	शिंदे, श्री. महेश संभाजीराजे (कोरेगाव)	८	०	१००%
२१८.	शिंदे, श्रीमती प्रणिती सुशीलकुमार (सोलापूर शहर मध्य)	५	३	६२.५%
२१९.	शिंदे, श्री. संजयमामा विठ्ठलराव (करमाळा)	८	०	१००%
२२०.	शिंदे, श्री. श्यामसुंदर (लोहा)	८	०	१००%
२२१.	शिरोळे, श्री. सिद्धार्थ अनिल (शिवाजीनगर)	८	०	१००%
२२२.	शिरसाट, श्री. संजय पांडुरंग (औरंगाबाद पश्चिम)	७	१	८७.५%
२२३.	सिद्दिकी, श्री. झीशान बाबा (वांद्रे पुर्व)	३	५	३७.५%
२२४.	सोळंके, श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव (माजलगाव)	८	०	१००%
२२५.	सोनवणे, श्रीमती लताबाई चंद्रकांत (चोपडा)	८	०	१००%
२२६.	सुर्वे, श्री. प्रकाश राजाराम (मागाठाणे)	८	०	१००%
२२७.	तापकीर, श्री. भिमराव (अण्णा) धोंडीबा (खडकवासला)	८	०	१००%

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२२८.	ठाकरे, श्री. विकास पांडुरंग (नागपूर पश्चिम)	३	५	३७.५%
२२९.	ठाकूर, श्री. हितेंद्र विष्णु (वसई)	०	८	०%
२३०.	ठाकूर, श्री. क्षितीज हितेंद्र (नालासोपारा)	८	०	१००%
२३१.	ठाकूर, श्री. प्रशांत रामशेठ (पनवेल)	८	०	१००%
२३२.	ठाकूर, श्रीमती विद्या जयप्रकाश (गोरेगाव)	६	२	७५%
२३३.	थोपटे, श्री. संग्राम अनंतराव (भोर)	८	०	१००%
२३४.	थोरवे, श्री. महेंद्र सदाशिव (कर्जत)	८	०	१००%
२३५.	टिळक, श्रीमती मुक्ता शैलेश (कसबा पेठ)	८	०	१००%
२३६.	टिंगरे, श्री. सुनिल विजय (वडगाव शेरी)	८	०	१००%
२३७.	तुपे, श्री. चेतन विठ्ठल (हडपसर)	०	८	०%
२३८.	वनगा, श्री. श्रीनिवास चिंतामण (पालघर)	८	०	१००%
२३९.	विखे-पाटील, श्री. राधाकृष्ण एकनाथराव (शिर्डी)	८	०	१००%
२४०.	वायकर, श्री. रविंद्र दत्ताराम (जोगेश्वरी पूर्व)	८	०	१००%
२४१.	वानखडे, श्री. बळवंत बसवंत (दर्यापूर)	८	०	१००%
२४२.	वरपुडकर, श्री. सुरेश अंबादासराव (पाथरी)	७	१	८७.५%
२४३.	उईके, श्री. अशोक रामाजी (राळेगांव)	८	०	१००%
२४४.	यादव (लोणीकर), श्री. बबनराव दत्तात्रय (परतूर)	७	१	८७.५%
२४५.	येरावार, श्री. मदन मधुकर (यवतमाळ)	७	१	८७.५%

अ.क्र.	सदस्यांचे नाव	उपस्थिती	अनुपस्थिती	उपस्थितीची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)
२४६.	झनक, श्री. अमित सुभाषराव (रिसोड)	८	०	१००%
२४७.	रिक्त	--	--	--
२४८.	रिक्त	--	--	--

विवरण क्रमांक - ७

महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२१ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील (मार्च २०२१) दैनंदिन कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल

सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१

सकाळी ११.०० वाजता दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर झालेल्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणानंतर २० मिनिटांच्या विश्रांतीनंतर विधानसभेची बैठक मुंबई येथील विधानसभेच्या सभागृहात सकाळी ११ वाजून ५५ मिनिटांनी माननीय उपाध्यक्ष श्री. नरहरी झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

अधिवेशनाचा शुभारंभ 'वंदे मातरम्' या गीताच्या समूह गायनाने झाला.

१. सचिव यांनी, राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवली.

२. श्री. सुनील प्रभू, वि.स.स. यांनी सभागृहाच्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडला—

" माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानसभेचे सदस्य , त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो."

सर्वश्री. सुरेश वरपुडकर व श्री. दिलीप बनकर, वि.स.स. यांनी सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभू यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास अनुमोदन दिले.

सदर प्रस्तावावरील चर्चा मंगळवार, दिनांक २ मार्च, २०२१ रोजी व बुधवार, दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी घेण्यात येईल, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

३. महसूल मंत्र्यांनी, सन २०२१ चा अध्यादेश क्रमांक १- महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०२१ सभागृहासमोर ठेवला.

४. वित्त व नियोजन मंत्री तथा उपमुख्यमंत्र्यांनी, सन २०२०-२०२१ च्या पुरवणी मागण्या सभागृहास सादर केल्या व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०३ खंड (३) अन्वये मिळालेल्या अधिकारात महाराष्ट्राच्या माननीय राज्यपाल महोदयांनी सन २०२०-२०२१ च्या पुरवणी मागण्या विचारात घेण्यात याव्यात, अशी शिफारस या सभागृहास केली आहे असे सांगितले.

मागण्या प्रस्तुत झाल्या.

माननीय उपाध्यक्षांनी, सन २०२०-२०२१ च्या पुरवणी मागण्या सभागृहास सादर करण्यात आलेल्या असून सदर मागण्यांवर चर्चा व मतदान गुरुवार, दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी होईल तसेच सदर दिवशी चर्चा व मतादानासाठी जे विभाग प्राथम्यक्रमाने घेण्यात येतील त्या विभागांवरील कपात सूचना बुधवार, दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील, असे घोषित केले.

५. सचिवांनी, विधान परिषदेने कोणत्याही सुधारणेशिवाय पारित केलेली ८ विधेयके आणि विधानपरिषदेने कोणत्याही शिफारशी शिवाय परत केलेली ९ विधेयके यांची यादी सभागृहास वाचून दाखविली.

६. माननीय उपाध्यक्षांनी, महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ८(१) अन्वये खालील सदस्यांना सभाध्यक्ष तालिकेवर नामनिर्देशित केले—

(१) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

(२) श्री. राजन साळवी, वि.स.स.

(३) ॲड. अशोक पवार, वि.स.स.

(४) श्री. संग्राम थोपटे, वि.स.स.

(५) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एखाद्या विषयावर बोलण्यासाठी उभे राहतात तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याबाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला व त्याबाबत आपले म्हणणे मांडले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी विदर्भ व मराठवाडा वैधानिक विकास महामंडळ त्वरित स्थापन करण्यासंदर्भातील माहितीचा मुद्दा यावेळी उपस्थित केला.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेता, श्री. नाना पटोले, वि.स.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी देखील यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

वित्त व नियोजन मंत्री तथा उपमुख्यमंत्र्यांनी या विषयाबाबत आपले म्हणणे मांडले.

७. माननीय उपाध्यक्षांनी, श्री. विलासराव (काका) बाळकृष्ण पाटील-उंडाळकर, माजी वि.स.स. व माजी मंत्री, सर्वश्री. सूर्यकांत व्यंकटराव महाडिक, आबाजी नाना पाटील, संपतराव

रामचंद्र जेधे, रणजित चुनीलाल भानू, नीळकंठराव यशवंतराव शिंदे, दौलतराव मल्हारी पवार व हरिभाऊ आत्माराम महाजन माजी वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

मंगळवार, दिनांक २ मार्च, २०२१

" राज्यभरात वीज देयके न भरल्यामुळे वीज जोडण्या तोडण्याचे आदेश दिले ," इ. बाबत चर्चा करण्यासाठी आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत नियम ५७ अन्वये विनंती केली असल्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सत्तारूढ पक्षाच्या ठरावामध्ये ती चर्चा समाविष्ट असल्याने सदर प्रस्तावावर एकत्रित चर्चा करता येईल, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

" उर्जा विभागाशी चर्चा होत नाही तोपर्यंत राज्यातील शेतकऱ्यांचे किंवा इतर घरगुती ग्राहकांचे वीज कनेक्शन तोडणे ताबडतोब थांबविण्यात येईल" अशी घोषणा उपमुख्यमंत्र्यांनी केली.

१. (१) तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चव्वेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ४२ ते ४७ सभागृहासमोर ठेवण्यात आली.

२. (१) विधि व न्याय राज्यमंत्र्यांनी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) उद्योग राज्यमंत्र्यांनी, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा छपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) नगरविकास मंत्र्यांनी,—

(क) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित (महामेट्रो) यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल, (ख) मुंबई रेल्वे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल, (ग) मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (घ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा सन २०१६-२०१७ व २०१८-२०१९ या वर्षांचा वार्षिक अहवाल, तसेच (ड़) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षण पुनर्विलोकन (तृतीय) अहवाल २०१३-२०१४ सभागृहासमोर ठेवले.

कार्यपद्धतीबाबतचा मुद्दा -

श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, आजच्या कामकाज पत्रिकेमधील (घ) क्रमांकावरील अहवाल ४ वर्षे विलंबाने सादर करण्यात येणे, इ. संदर्भात कार्यपद्धतीबाबतचा मुद्दा उपस्थित केला.

नगरविकास मंत्र्यांनी उक्त मुद्याबाबत खुलासा केला.

कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे - (सुरू)

(४) रोजगार हमी योजना मंत्र्यांनी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना— महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना या योजनांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(५) संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी, विधानसभेच्या सन २०२० च्या चौथ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक १४ डिसेंबर, २०२० ते दिनांक १५ डिसेंबर, २०२० या कालावधीत मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण २२ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२० चे चौथे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण २१२ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहासमोर ठेवली.

३. आज प्राप्त झालेल्या स्थगन प्रस्तावाच्या सर्व सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

४. सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभु यांनी सभागृहाच्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले -

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानसभेचे सदस्य त्यांचे मनःपूर्वक आभार."

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(१) श्री. सुरेश वरपूडकर

(२) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेता

(३) श्री. नाना पटोले (भाषण अपूर्ण)

राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस) - (पुढे सुरू)

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(४) श्री. नाना पटोले (भाषण पूर्ण)
(५) श्री. चंद्रकांत पाटील
(६) श्री. अबू आझमी
(६) श्रीमती यामिनी जाधव
(७) डॉ. संजय कुटे
(८) श्री. अशोक पवार
(९) श्री. अमिन पटेल
(१०)श्री. जयकुमार गोरे
(११) श्री. दीपक चव्हाण
(१२) श्री. रवींद्र वायकर
(१३) श्री. किशोर जोरगेवारे
(१४) श्री. रवि राणा
(१५) श्री. योगेश कदम

(चर्चा अपूर्ण)

५. (अ) पुरःस्थापनार्थ :-

(१) महसूल राज्यमंत्र्यांनी, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १—महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(२) वित्त मंत्र्यांनी, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २—महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०२१ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा (पहिला दिवस) - (चर्चा पुढे सुरू)

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला.

(१६) श्री. सुनील शेळके
(१७) श्री. रईस शेख
(१८) श्री. समीर कुणावार
(१९) श्रीमती सुलभा खोडके
(२०) श्रीमती मनिषा चौधरी
(२१) श्रीमती सरोज अहिरे
(२२) ॲड. राहुल कुल
(२३) श्री. संजय जगताप
(२४) श्री. अतुल भातखळकर

बुधवार, दिनांक ३ मार्च, २०२१

१. (१) तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील त्रेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

२. **(१) विधि व न्याय राज्यमंत्र्यांनी,** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये विधी व न्याय विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(२) गृह (ग्रामीण) राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचा सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(३) गृहनिर्माण मंत्र्यांनी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे सन २००५-२००६ ते २०१०-२०११ या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवले.

(४) सहकार राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे सन २०१९-

२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(५) संसदीय कार्य राज्य मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये संसदीय कार्य विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(१) श्रीमती प्रणिती शिंदे वि.स.स. यांनी, " ४० वर्ष वय असलेला व्यक्तीचा कोरोना लसीचा दुसरा डोस घेतल्यानंतर झालेला मृत्यू" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत नोंद घ्यावी असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(२) प्रा. देवयानी फरांदे वि.स.स. यांनी, "त्यांच्या मतदारसंघातील बिमवाडी भागात एका तरुणाने पोलीस अधिकाऱ्याच्या जाचाला कंटाळून केलेली आत्महत्या" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत लक्ष घालावे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

गृह मंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

(३) श्रीमती श्वेता महाले वि.स.स. यांनी, जळगाव येथे आशादीप महिला वसतीगृहातील मुलींना चौकशीकरिता बोलावून पोलीसांनी त्यांच्या अंगावरील कपडे काढण्यास सांगणे" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

गृह मंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

सर्वश्री. सुधीर मुनगंटीवार, देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनी उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपले मत मांडले.

या प्रकरणी स्थापन केलेल्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या समितीचा अहवाल आल्यानंतर नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल असे गृह मंत्र्यांनी सांगितले.

सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, दिनांक १ ते ५ मार्च, २०२१ या कालावधीत विधानसभेच्या प्रांगणातील मुख्य प्रवेशद्वाराजवळील मंडपात सकाळी ११.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत आयडीएफसी फर्स्ट (IDFC FIRST BANK) बँकेकडून फास्टॅग (FASTag) पुरविण्यात येत आहेत. फास्टॅग न घेतलेल्या सन्माननीय सदस्यांनी उक्त सुविधेचा

लाभ घ्यावा. फास्टॅग पुरविण्यात आलेल्या सदस्यांचा तपशिल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यालयास पाठविल्यानंतर नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून टोल फी माफीसंदर्भातील कार्यवाही पूर्ण केल्यानंतरच फास्टॅग कार्यान्वित होतील असे माननीय उपाध्यक्षांनी घोषित केले.

३. आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

श्री.देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, "राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत वाईट असून अतिवृष्टी, तीन वेळा झालेला अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे झालेले नसणे तसेच प्रामाणिकपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान म्हणून ५० हजार रुपये देण्याची घोषणा सरकारने केली होती. परंतु त्यांना देखील मदत मिळाली नसणे" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सन्माननीय सदस्य श्री. बालाजी कल्याणकर यांनी, "एका विभागातील निधी दुसऱ्या विभागात वापरल्याबाबत तसेच या कामाच्या उद्घाटनाच्या फलकावर स्थानिक आमदारांचे नाव नसणे" या विषयाबाबत श्री. अविनाश धोंडगे, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाची सूचना दिली असून त्यावर सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

श्री. बालाजी कल्याणकर वि.स.स. यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना मला प्राप्त झाली असून त्यावर पुढील कार्यवाहीसाठी विशेषाधिकार समितीकडे पाठविण्यात येईल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

४. राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री . रमेश कोरगांवकर
(२) श्री. राधाकृष्ण विखे-पाटील
(३) श्री.सुधीर मुनगंटीवार
(४) श्री.विक्रमसिंह सावंत
(५) डॉ. विनय कोरे
(६) श्री.रोहित पवार
(७) श्री. अतुल बेनके
(८) ॲड. आशिष शेलार

मुख्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

उर्जा मंत्र्यांनी, "दि. १२ ऑक्टोबर, २०२० रोजी मुंबई महानगराचा विद्युत पुरवठा खंडित होणे" इ. बाबत नियम ४७ अन्वये निवेदन केले.

विचार, खंडशः विचार व संमत करणे-

५. (१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये ॲड. राहुल कुल वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२१ महाराष्ट्र आध्यादेश क्रमांक १— महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०२१ नापसंत करते".

अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी सन्माननीय सदस्य ॲड. राहुल कुल यांचा उपरोक्त प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

(ख) संसदीय कार्य मंत्र्यांनी, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरूवात करावी असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(क) नगरविकास मंत्र्यांनी, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २—महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०२१ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार, दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस आणि तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य ॲड.राहुल कुल यांचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीच्या प्रश्नावर चर्चा होईल. तद्नंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावरील भाषणास सुरूवात करावी असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(सन्माननीय सदस्यांची भाषणे झाली नाहीत.)

विधेयक विचारात घेण्यासंबधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

गुरुवार, दिनांक ४ मार्च, २०२१

श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. यांनी, " नांदेड जिल्ह्यातील मुदखेड तालुक्यामध्ये अनाथांच्या आश्रमशाळेमध्ये १३ व १६ वर्षे वयाच्या चिमुकल्या मुलींवर तेथील संस्था चालकाकडून झालेला बलात्कार तसेच औरंगाबाद शहरातील कोविड सेंटरमध्ये एका भगिनीवर डॉक्टरांनीच केलेला बलात्कार " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने यासंदर्भात नोंद घ्यावी असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त माहितीच्या मुद्यासंदर्भात उप मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला.

१. (१) सात तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा पदाची निवडणूक" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त माहितीच्या मुद्यासंदर्भात श्री.नाना पटोले, वि.स.स. यांनी आपले मत मांडले.

सभागृहामध्ये गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाली व अशा परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होणार नसल्यामुळे सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १७ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

गृहमंत्र्यांनी, "जळगाव येथील महिला वसतिगृहामधील महिलांना पोलीसांनी नग्न होऊन नृत्य करण्यास सांगणे" इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

माननीय उपाध्यक्षांनी पुढील घोषणा केली—

"सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, "कर्नाटक सीमा वाद संघर्ष आणि संकल्प": या पुस्तकाच्या प्रती दिनांक ४ व ५ मार्च २०२१ रोजी माननीय सदस्यांच्या हजेरीपटाजवळील जागेत वितरित करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे तरी कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी या पुस्तकाची प्रत प्राप्त करून घ्यावी."

(१) श्री.देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, "उस्मानाबाद शहरात हनुमान चौक येथे एका विवाहित महिलेवर बंदुकीच्या धाकावर बलात्कार करण्यात येणे" इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

सदर विषयाच्या संदर्भात तत्काळ माहिती सादर करण्यात यावी असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

२. (१) संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये जलसंपदा विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(२) महसूल राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये महसूल व वन विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(३) संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(४) ऊर्जा राज्यमंत्र्यांनी, (क) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा चौदावा वार्षिक अहवाल आणि (ख) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(५) परिवहन मंत्र्यांनी, (क) कोंकण रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल आणि (ख) महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत विकास महामंडळ लिमिटेड यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

३. (१) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "वैधानिक विकास मंडळे स्थापन न करणे" या विषयाबाबत माननीय अर्थ व नियोजन मंत्री यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाची सूचना दिली असून सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी उपरोक्त विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत थोडक्यात म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना तपासून घेऊन आवश्यकता वाटल्यास विशेषाधिकार समितीकडे पाठविण्यात येईल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी, "मतदारसंघातील भूमी पूजनाच्या कामाचे निमंत्रण न देणे" या विषयाबाबत विशेषाधिकार भंगाची सूचना दिली असून सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

श्री. हिरामण खोसकर, वि.स.स. यांनी उपरोक्त विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत थोडक्यात म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना तपासून घेऊन आवश्यकता वाटल्यास विशेषाधिकार समितीकडे पाठविण्यात येईल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

४. उप मुख्यमंत्र्यांनी, पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती

महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी." इ.बाबतचा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, "पुरवणी मागण्यांमध्ये वैधानिक मंडळनिहाय विवरणपत्र नसणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात उप मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण केले.

५. (१) गृह विभाग

(२) महसूल व वन विभाग

(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

(४) नगरविकास विभाग

(५) वित्त विभाग

(६ सार्वजनिक बांधकाम विभाग

(७) जलसंपदा विभाग

(८) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

(९) ग्रामविकास विभाग

(१०) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(११) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(१२) सार्वजनिक आरोग्य विभाग

(१३) आदिवासी विकास विभाग

(१४) महिला व बालविकास विभाग

आता गृह विभाग, महसूल व वन विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग नगर विकास विभाग, वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ग्रामविकास विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालविकास विभाग या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक

बी-१, बी-३, बी-४ सी-१, सी-५, सी-६, डी-३, डी-४, डी-६, डी-९, एफ-२, जी-१, जी-६, एच-६, एच-७, एच-८, आय-५, के-६, के-११, एल-२, एल-७, एम-३, एन-३, आर-१, टी-५, एक्स-१, ए-४, ई-२, जे-१, एस-१, एस-४, डब्ल्यू-२, झेडए-२ चर्चेला घेण्यात येतील व या कार्यक्रमाचा तपशील कार्यक्रमपत्रिकेबरोबर वितरीत केला असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

माननीय उपाध्यक्षांनी कार्यपद्धती विशद केली व आता कोणीही कपात सूचना मांडणार नाही असे गृहीत धरून चर्चेला प्रारंभ होईल असे सांगितले.

पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) ॲड. आशिष शेलार
(२) श्री.दिलीप लांडे
(३) श्री.मंगलप्रभात लोढा
(४) डॉ.किरण लहामटे
(५) श्रीमती नमिता मुंदडा
(६) श्रीमती प्रतिभा धानोरकर
(७) डॉ.देवराव होळी
(८) श्री.अबु आजमी
(९) श्री.सचिन कल्याणशेट्टी
(१०) श्री.अनिल पाटील
(११) श्री.कालिदास कोळंबकर
(१२) श्री.संग्राम थोपटे
(१३) श्री.मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक
(१४) श्री.अभिमन्यू पवार
(१५) श्री.संदिप क्षीरसागर
(१६) श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर
(१७) श्री.देवेंद्र भुयार
(१८) श्री.कुणाल पाटील
(१९) श्री.दादाराव केचे
(२०) श्री.बळवंत वानखेडे
(२१) श्री.सिद्धार्थ शिरोळे
(२२) श्री.ज्ञानराज चौगुले
(२३) श्री.श्रीनिवास वनगा
(२४) श्री. कैलास गोरंट्याल
(२५) श्री. राजेश पवार
(२६) श्रीमती यामिनी जाधव
(२७) श्री. इंद्रनील नाईक
(२८) श्री. लहू कानडे
(२९) श्री. राम सातपुते
(३०) श्री. रत्नाकर गुट्टे

उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी विभागाच्या मागण्यांवरील चर्चेस उत्तर दिले.

गृह विभाग, महसूल व वन विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग नगरविकास विभाग, वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ग्रामविकास विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालविकास विभाग या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक बी-१, बी-३, बी-४, सी-१, सी-५, सी-६, डी-३, डी-४, डी-६, डी-९, एफ-७, जी-१, जी-६, एच-६, एच-७, एच-८, आय-५, के-६, के-१, एल-२, एल-७, एन-३, आर-१, टी-५, एक्स-१, ए-४, ई-२, जे-१, एस-१, एस-४, डब्ल्यू-२, झेडए-२, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात येत आहेत असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

चर्चारोधानंतर असलेल्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक —

(१) सामान्य प्रशासन विभाग - ए -४,

(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग - ई -२,

(३) विधि व न्याय विभाग - जे -१,

(४) वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग—एस-१, एस-४,

(५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग - डब्ल्यू -२

(६) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग - झेडए -२

आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकण्यात आल्या.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

६. पुरःस्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

वित्त व नियोजन मंत्र्यांनी, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२१ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य सर्वश्री. देवेंद्र फडणवीस व सुधीर मुनगंटीवार यांनी सुधारणा दिलेल्या आहेत त्यांनी त्या मांडाव्यात असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

उपरोक्त विधेयकाच्या अनुषंगाने श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सुधारणा मांडल्या व त्या पृष्ठ्यर्थ आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त विधेयकासंदर्भात श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. व श्री.देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी दिलेल्या सुधारणांबाबत चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(ब) पुरःस्थापनार्थ -

नगरविकास मंत्र्यांनी, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४—महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

७. सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड.आशिष शेलार, डॉ.संजय कुटे, सर्वश्री रवि राणा, संभाजी पाटील-निलंगेकर, अतुल भातखळकर, राम कदम, गणेश नाईक, नितेश राणे, जयकुमार रावल, गिरीष महाजन, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री समीर कुणावार, बबनराव लोणीकर, सुनील राणे, हरीभाऊ बागडे, अभिमन्यु पवार, सचिन कल्याणशेट्टी, शिवेंद्रसिंह भोसले, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड पराग अळवणी, सर्वश्री मंगलप्रभात लोढा, रणधीर सावरकर, मोहन मते, संतोष दानवे, प्रशांत बंब, अमित साटम, सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड राहुल कुल, सर्वश्री सिद्धार्थ शिरोळे, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :

डॉ.संजय कुटे, वि.स.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले -

"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, पुणे येथे पूजा चव्हाण आत्महत्या प्रकरणी संशयित मंत्र्यांचा राजीनामा घेतला असला तरी तो तीन दिवसांनंतरही राज्यपालांकडे पाठविलेला नसल्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम, या प्रकरणी २४ दिवसांचा कालावधी होऊनही गुन्हा दाखल झालेला नसून तपासाबाबत राज्यातील जनतेला अंधारात ठेवले असणे, पारदर्शक पद्धतीने तपास होण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेकडे तपास देण्याची आवश्यकता, ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यात झालेली वाढ, डान्सबारला आळा घालण्यात आलेले अपयश, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, पोलीसांवर पडणारा ताण, पुणे, नागपूर, नाशिक यासारख्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळू माफियांकडून, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांकडून, शासकीय अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले व जीवे मारण्याच्या धमक्या, कोरोना काळात पोलीसांवर झालेले हल्ले, सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यांना मिळालेले मोकळे रान, सामाजिक अत्याचारात झालेली वाढ, महान कलाकारांची गुप्तहेरांमार्फत चौकशी करण्याचा सरकारने घेतलेला घृणास्पद निर्णय, गुंडाराजचे होत असलेले उदात्तीकरण, राज्यावर घातपाती कारवायांचे असलेले गंभीर सावट, जातीय हिंसाचारात झालेली वाढ, जातपंचायतीच्या अत्याचाराच्या समोर आलेल्या घटना, तसेच, मुंबईतील अनेक मोठ्या व जनउपयोगी प्रकल्पांचे रखडलेले काम, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचार व अनियमिततेची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची रखडलेली कामे, मुंबईच्या विविध समस्यांनी धारण केलेले उग्र स्वरूप, मुंबईतील रखडलेली विकास कामे, महानगरपालिकेने गेल्या १० वर्षांत केलेला खर्च, याबाबत श्वेतपत्रिका जाहीर करण्याची होत असलेली मागणी, मुंबईतील मेट्रोची कारशेड कांजूरमार्गलाच करण्याबाबत सरकारने धरलेला दुराग्रह त्यातून मेट्रोला होणारा विलंब व मुंबईकरांचे होणारे नुकसान, कोस्टल रोडच्या, धारावी पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्यात होत असलेला विलंब कामांमुळे मच्छीमारांचे निर्माण झालेले प्रश्न, उपकर प्राप्त इमारतींचा प्रश्न, बीडीडी चाळींच्या पुनर्विकासातील समस्या, देवनार डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न, सेस इमारतींचा प्रश्न, झोपडपट्टी पुनर्वसन, समस्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष यासारख्या मुंबईच्या महाकाय प, भाडायाची घरे, परवडणारी घरे, स्वयंपुनर्बांधणी, पुनर्बांधणीप्रकल्पांमुळ विस्थापित झालेल्यांच्या समस्या, तसेच कोरोना, मास हाऊसिंग सारखे प्रश्न व त्याबाबतच्या उपाययोजनांमध्ये निर्माण झालेल्या समस्या, कोरोना उपाययोजनात झालेला भ्रष्टाचार, प्रादुर्भाव व मृत्यूची संख्या देशपातळीवर महाराष्ट्रात सर्वाधिक, टाळेबंदीमुळे अडचणीत आलेल्यांना सरकारने पॅकेजेस देण्यात केलेली कुचराई, सत्तारूढ पक्षाच्या नेत्यांकडून कोरोना नियमांचे झालेले उल्लंघन, कोरोना हाताळण्यात सरकारला आलेले अपयश, तसेच राज्यातील विविध विभागांचा संतुलित विकास करण्यात व

टाळेबंदी शिथिलीकरणानंतर या विभागांचे अर्थचक्र सुरळीत करण्यात सरकारला आलेले अपयश, राज्यातील अनुसूचित जाती, धनगर, मराठा, इतर मागासवर्ग, अनुसूचित जमाती, त्याचा लाभ देण्यात सरकारला आलेले अपयश, आर्थिकदृष्ट्या मागास यांच्यासाठीच्या योजना राबवण्यात" याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उक्त प्रस्तावावरील डॉ.संजय कुटे यांचे भाषण अपूर्ण

(चर्चा अपूर्ण)

शुक्रवार, दिनांक ५ मार्च २०२१

म.वि.स.नियम ५७ अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करणेबाबत

श्री. देवेंद्र फडणवीस ,विरोधी पक्षनेता यांनी सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणासंदर्भात दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने म.वि.स.नियम ५७ अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबतच्या प्रस्तावाची नोटीस दिलेली असल्याचे सांगितले व याबाबत आपले सविस्तर म्हणणे मांडले.

उप मुख्यमंत्र्यांनीही याबाबत आपले म्हणणे मांडले.

सदरहू प्रस्तावाचा विषय नियम ५७ च्या निकषात बसणारा असला तरीही विषयाचे गांभीर्य व कायदेशीर गुंतागुंत लक्षात घेता, अधिवेशन संपण्यापूर्वी शासनाने याबाबत निवेदन करावे, असे निदेश माननीय उपाध्यक्षांनी दिले.

१. (१) तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सेहेचाळीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

२. माननीय उपाध्यक्षांनी , श्री. माणिकराव प्रल्हादराव गावंडे, माजी वि.स.स. यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधिमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

३. (१) **सामान्य प्रशासन राज्यमंत्र्यांनी,** महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे मा. राज्यपाल महोदयांना सादर केलेले सन २०१३ चे २, सन २०१४ चे २३, सन २०१५ चे २, सन २०१६ चे ३, सन २०१८ चा १ आणि सन २०१९ चा १ असे एकूण ३२ विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवले.

(२) **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) राज्यमंत्र्यांनी,** महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) **वित्त व नियोजन मंत्र्यांनी,** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२०-२०२१ हे प्रकाशन सभागृहासमोर ठेवले.

(४) **सार्वजनिक बांधकाम(सार्वजनिक उपक्रम वगळून) राज्यमंत्र्यांनी**, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(५) **नगरविकास मंत्र्यांनी,** (क) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये नगरविकास विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र, (ख) शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल, (ग) महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लिमिटेड यांचा सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (घ) महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड यांचा सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल आणि (ड.) सन २०१५ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये "मेट्रो ३ च्या भुयारी प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या परिसरातील हजारो इमारती व कुटुंबांवर विपरित परिणाम होणे" या विषयावरील श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांच्या दिनांक १३ मार्च २०१५ रोजी उत्तरित झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

(६) **अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्र्यांनी,** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत

व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(७)संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी, (क)विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर आणि (ख) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(८) महिला व बालविकास मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) (सुधारणा) नियम, २०२० प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बा.न्या.म.-२०१९/प्र. क्र.१२७/का-०३, दिनांकित २८ डिसेंबर २०२० सभागृहासमोर ठेवली.

(९) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य राज्यमंत्र्यांनी, सन २०१७ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनामध्ये " चेंबूर येथील शासनाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारा आहार निकृष्ट असणे" या विषयावरील डॉ. बालाजी किणीकर व इतर वि.स.स. यांच्या दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी उत्तरित झालेल्या लक्षवेधी सूचनेवरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

४. श्री.रणजित कांबळे, समिती प्रमुख यांनी, अंदाज समितीचा पहिला व दुसरा अहवाल सभागृहास सादर केला.

५. श्री.दीपक केसरकर, समिती प्रमुख यांनी खालील प्रस्ताव मांडला.—

१. सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी श्री.अर्णब गोस्वामी, संपादक, वृत्त निवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक, रिपब्लिक टिव्ही वृत्तवाहिनी यांचेविरुद्ध दिनांक ७ सप्टेंबर २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

२. सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी हिंदी सिनेअभिनेत्री कंगना राणावत यांचेविरूद्ध दिनांक ७ सप्टेंबर २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम १८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

माननीय उपाध्यक्षांनी, आज प्राप्त झालेल्या सर्व स्थगन प्रस्तावाच्या सूचनांना दालनात अनुमती नाकारली असल्याचे सांगितले.

माननीय उपाध्यक्षांनी, "कोयना धरणातील पुनर्वसनाच्या बैठकीला अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी असताना निमंत्रित न करणे " इ.बाबत श्री.महेश संभाजीराजे शिंदे, वि.स.स. यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी, श्री. रामचंद्र शिंदे, निवासी जिल्हाधिकारी, श्री.थोरवे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रीमती कीर्ति नलावडे आणि सर्व उपविभागीय अधिकारी यांच्याविरूद्ध विशेषाधिकारभंगाची सूचना दिली असल्याचे सांगून त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे, असे सांगितले.

श्री. महेश संभाजीराव शिंदे, वि.स.स. यांनी उपरोक्त सूचनेबाबत आपले म्हणणे थोडक्यात मांडले.

सदरहू हक्कभंगाचा प्रस्ताव तपासून त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे निदेश माननीय उपाध्यक्षांनी दिले.

माहितीच्या मुद्याबाबत

श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांनी, 'उटीगे या गावातील तंटामुक्ती समितीचे सदस्य श्री. लोकाप्पा केडगुंड यांना दिनांक ३ मार्च २०२१ रोजी टेम्पोने चिरडण्यात आल्याच्या घटनेबाबतचा अहवाल गृह विभागामार्फत सभागृहाच्या पटलावर ठेवणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय उपाध्यक्षांनी दिले.

६. **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्र्यांनी**, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५—महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

श्रीमती माधुरी मिसाळ , वि.स.स. यांनी, "महाराष्ट्र विधानसभेच्या सभागृहात २० ते २२ महिला आमदार असून विधान भवनाच्या पूर्ण इमारतीमध्ये त्यांना फक्त ६० ते ७० फुटाची लेडिज रूम दिलेली असणे " इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात तातडीने व्यवस्था करण्यात येईल, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

शासकीय विधेयके (पुढे सुरू)

विचार, खंडशः विचार व संमत करणे-

नगर विकास मंत्र्यांनी, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ u महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१ सभागृहाच्या अनुमतीने विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचा पहिला प्रस्ताव आणि श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांचा दुसरा प्रस्ताव मांडण्यात आले नाही.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता

(२) ॲड. आशिष शेलार, वि.स.स.

नगरविकास मंत्र्यांनी उपरोक्त चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी , 'सभागृहात काल उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्यावर शासनाने त्वरित निर्णय घेऊन त्याबाबतीत कायद्याच्या संदर्भातील माहिती देण्याची आवश्यकता' तसेच 'राज्यातील वीजदर वाढ कमी करण्यासंदर्भात राज्य सरकारने घ्यावयाची भूमिका' याबाबत माहितीचा व कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

तसेच कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा घेत असतानाच गडचिरोली जिल्ह्यातील चंद्रपूर, भामरागड, सिरोंचा, अंकिसा, आसरोल्ली या दुर्गम डोंगराळ भागात इंटरनेट कनेक्टीव्हीटी नसल्याबाबत, हरकतीचा मुद्दा देखील उपस्थित केला.

शालेय शिक्षण मंत्र्यांनी गडचिरोली, चंद्रपूर यांच्यासह राज्यातील डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण घेताना येत असलेल्या अडचणींबाबत आपले म्हणणे मांडले. ॲड. आशिष शेलार यांनीही उपरोक्त विषयावर आपले म्हणणे सविस्तरपणे मांडले.

(१) श्री. समीर कुणावार, वि.स.स. यांनी, 'कोरोना काळात खाजगी व कॉन्व्हेंट शाळांमधील व्यवस्थापन आणि पालकवर्ग यांच्यात फी आकारणीवरून भांडण सुरू असणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स., 'श्रीमती चित्रा वाघ, वि.स.स. यांनी काही विषयासंदर्भात शासनाकडे कारवाई करण्याची मागणी करणे, त्यांना सुरक्षा पुरविण्यात येणे' इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

७. 'राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था तसेच मुंबईतील विविध समस्या' इ. बाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता व इतर वि.स.स. यांचा म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) डॉ. संजय कुटे (२) श्री. सुनील प्रभू

(३) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता (भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

८. **ग्रामविकास मंत्र्यांनी,** 'मागासप्रवर्गाच्या आरक्षणाशी संबंधित माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय' इ. बाबत म.वि.स. नियम ५७ अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी निवेदन सभागृहात केले.

'राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था तसेच मुंबईतील विविध समस्या' इ. बाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता व इतर वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(३) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता (भाषण पूर्ण)

(४) श्री. नाना पटोले

(५) श्री. नितेश राणे

(६) श्री. रविंद्र वायकर (भाषण अपूर्ण)

माननीय गृहमंत्र्यांनी, 'गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद्यांचा शस्त्रास्त्रांचा कारखाना पोलीसांनी उद्ध्वस्त करणे' इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

'राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था तसेच मुंबईतील विविध समस्या' इ. बाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता व इतर वि.स.स. यांचा म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(६) श्री. रविंद्र वायकर
(७) श्री. किशोर जोरगेवार
(८) श्री. रवि राणा
(९) श्री. अमिन पटेल
(१०) श्री. मंगेश कुडाळकर
(११)श्री. अमित साटम
(१२) श्री. लहू कानडे

(भाषण पूर्ण) (चर्चा अपूर्ण)

गृह मंत्र्यांनी, 'दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी श्री. मुकेश अंबानी यांच्या घरासमोर सापडलेल्या स्कॉर्पिओ गाडीचे ताबेदार श्री. मनसुख हिरेन यांचा मृतदेह मुंब्रा, रेती बंदर येथे सापडणे.' इ. बाबतचे निवेदन सभागृहात केले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

ॲड. आशिष शेलार, ॲड. अनिल परब, श्री. नाना पटोले वि.स.स. यांनीदेखील उपरोक्त विषयाबाबत म्हणणे मांडले.

'राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था तसेच मुंबईतील विविध समस्या'इ. बाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता व इतर वि.स.स. यांचा म.वि.स.नियम २९३ अन्वये

प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१३) ॲड. पराग अळवणी (१४)श्री. रईस शेख

(भाषण पूर्ण) (चर्चा अपूर्ण)

८. (१) श्री. अतुल भातखळकर, श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरः स्थापित केले.

(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १०—महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरः स्थापित केले.

(३)श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी, सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११—महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची माता-पित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासंबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरः स्थापित केले.

(४) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १२—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(५) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १३—महाराष्ट्र राज्यात लैंगिक अपराधास प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिराती फलक लावण्यास तसेच यासंदर्भातील अनेक संकेतस्थळांवर व समाजमाध्यमांवर प्रतिबंध करण्यास तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(६) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १४—महाराष्ट्र वेश्म मालकी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(७)श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २०—जमीन महसूलाच्या माफीबाबत (क्रमांक १) (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(८) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २१—महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(९) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२—राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(१०) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३—महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास सुधारणा) विधेयक २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

(११) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४—महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक २०२० सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

'राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था तसेच मुंबईतील विविध समस्या'इ. बाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता व इतर वि.स.स. यांचा म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१५) श्री. अतुल भातखळकर

(भाषण पूर्ण) (चर्चा अपूर्ण)

' राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था तसेच मुंबईतील विविध समस्या'इ. बाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता व इतर वि.स.स. म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१६) श्री. विक्रमसिंह सावंत (१७) श्रीमती यामिनी जाधव

(१८) श्रीमती मनिषा चौधरी

(भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांनी, श्री. मुकेश अंबानी यांच्या घरासमोर गाडीत सापडलेला स्फोटकांचा साठा व त्या गाडीतील श्री. मनसुख हिरेन यांचा झालेला मृत्यू याबाबत गृह मंत्र्यांनी

स्पष्टीकरण देण्यासंदर्भात माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

सभागृहाची बैठक रात्रौ ०७ वाजून ४९ मिनिटांनी ०५ मिनिटांकरिता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक रात्रौ ०७ वाजून ५४ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

‘ राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था तसेच मुंबईतील विविध समस्या’इ. बाबत सर्वश्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेता व इतर वि.स.स. यांचा म.वि.स.नियम २९३ म.वि.स.नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१८) श्रीमती मनिषा चौधरी (भाषण पूर्ण) (१९) श्री. दिलीप लांडे

(२०) ॲड. राहुल कुल (२१) डॉ. भारती लव्हेकर

(२२) श्रीमती श्वेता महाले (२३) श्री. संजय केळकर

(२४) कॅप्टन आर.तमिलसेल्वन (२५)श्री. मिहिर कोटेचा

(२६) श्री. प्रशांत ठाकूर (२७)श्री. प्रताप अडसड

(चर्चा अपूर्ण)

(मंत्र्यांचे उत्तर शेष)

सोमवार, दिनांक ८ मार्च, २०२१

माननीय उपाध्यक्षांनी सदनाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांना शुभेच्छा दिल्या.

श्री. रवींद्र वायकर, वि.स.स यांनी, “विधिमंडळाच्या अधिवेशनापूर्वी घेण्यात आलेल्या आरटीपीसीआर चाचण्यांच्या निकालाबाबतची माहिती मिळणे” इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात शासनाने माहिती द्यावी, अशी सूचना माननीय उपाध्यक्षांनी केली.

श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स यांनी, “जागतिक महिला दिनानिमित्त आज संध्याकाळपर्यंत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांची नियुक्ती करणे,” इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घेतली असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

१. (१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पंचावन्न प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

१) डॉ. संजय कुटे, वि.स.स यांनी, "शासकीय दर्जा मिळणेबाबत संगणक चालकांचे आझाद मैदानावर सुरू असलेले आंदोलन," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनी, उक्त मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले.

सरकारने याची नोंद घ्यावी, असे निदेश माननीय उपाध्यक्षांनी दिले.

गृह मंत्र्यांनी, "मनसुख मिस्त्रीलाल हिरेन याच्या गूढ मृत्यूची चौकशी," इ. बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(२) श्री. नाना पटोले, वि.स.स यांनी, "युपीएससी परिक्षेचे अर्ज भरण्याची शेवटची तारीख जवळ येत असून ओबीसी उमेदवारांना अद्याप नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र न मिळणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत तातडीने कारवाई करून मुलांचे कोणतेही नुकसान होणार नाही, असे संसदीय कार्यमंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री. अमिन पटेल, वि.स.स यांनी, "लवकरच प्रदर्शित होत असलेल्या वेबसिरिज व चित्रपटांमुळे मुंबईमधील नागपाडा पोलीस स्टेशनच्या अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उद्‌भवण्याची शक्यता," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत सरकारने नोंद घ्यावी, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(३) श्री. अबु आझमी, वि.स.स यांनी, "अनेक सन्माननीय सदस्य कोरोना चाचणी न केल्यामुळे सदनाबाहेर अडकणे व दक्षिण मुंबईतील अंजुमन इल्सामच्या मालमत्तेवर करण्यात आलेला अवैध कब्जा," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

सत्यस्थिती तपासून माहिती पटलावर ठेवण्यात येईल, असे अल्पसंख्याक मंत्र्यांनी सांगितले.

(४) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स यांनी, "विविध परीक्षांसाठी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र न मिळणे, पडताळणीला मुदतवाढ मिळण्यासाठी शासनाने निर्देश देणे," .बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने नोंद घ्यावी, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनी, "श्रीरामपूरचे व्यापारी श्री. गौतम हिरण यांच्या मृत्यूप्रकरणी कोणतीही कारवाई न होणे, तसेच सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र राऊत यांना फेसबुक लाईव्हवरून मिळालेली धमकी," इ. बाबत माहितीचे मुद्दे उपस्थित केले.

सदर दोन्ही मुद्दे महत्त्वाचे असून सरकारने याविषयी तात्काळ चौकशी करावी, असे निर्देश माननीय उपाध्यक्षांनी दिले.

२. (१) सामान्य प्रशासन राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सामान्य प्रशासन विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(२) संसदीय कार्य राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये नियोजन विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(३) उद्योग, मराठी भाषा मंत्र्यांनी,

(क) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये मराठी भाषा विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र, (ख) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१६-२०१७ ते २०२०-२०२१ या वर्षांचे अर्थविवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या वर्षाचे सुधारीत अंदाज पत्रक, (ग) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचा अनुक्रमे चोपन्नावा व पंचावन्नावा वार्षिक अहवाल तसेच (घ) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचा वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवले.

श्री. योगेश सागर, वि.स.स. यांनी, "आर्थिक विषयांशी संबंधित महामंडळांचे अहवाल वेळेत न मिळणे," इ. बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

मंत्रि महोदयांनी नोंद घ्यावी, असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे—(पुढे सुरू)

(४) कामगार मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(५) ऊर्जा मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(६) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी,

(क) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २००९-२०१० ते २०१३-२०१४ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल, (ख) मुंबई विद्यापीठ यांचे सन २०१४-२०१५ ते २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक अहवाल, (ग) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (घ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे, (ड़) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपुर यांचे सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे, (च) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचे २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह), (छ) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी नांदेड यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (ज) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल, (झ) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल, (ट) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखा परीक्षण अहवाल, तसेच (ठ) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा बासष्टावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(७) कृषी राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व

अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(८) मृद व जलसंधारण मंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये मृद व जलसंधारण विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(९) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(१०) पर्यावरण व वातावरणीय बदल राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

३. (१) शक्ती विधेयकासंदर्भात गृहमंत्र्यांचा प्रस्ताव –

उक्त विषेयकांसदर्भात संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी वाढविण्यासंबंधी गृह मंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला —

"सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक ५१ — शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० यावर विचार करण्यासाठी दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानसभेच्या पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

म.वि.स. नियम ९३ अन्वयेच्या प्रस्तावाबाबत–

आजच्या कामकाज पत्रिकेतील म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्तावावरील चर्चेस माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर उद्याच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात येईल, असे तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

शासकीय विधेयके–(पुढे सुरू)

(२) विचार, खंडशः विचार व संमत करणे –

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्र्यांनी, सन २०२१ चे वि.स. वि. क्रमांक ५—महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

(क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी पहिला प्रस्ताव मांडला.

"सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५—महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते यांनी दुसरा प्रस्ताव मांडला.

"सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५—महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

प्रस्ताव प्रस्तुत झाले.

विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठवण्याबाबतचे प्रस्ताव यांच्यावर एकत्रित चर्चा सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुधीर मुनगंटीवार

(२) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजता पुन्हा सुरू झाली.

४. वित्त मंत्र्यांनी, सन २०२०-२०२१ चा अर्थसंकल्प सादर केला व भाषण केले.

मंगळवार, दिनांक ९ मार्च, २०२१

१. (अ) (१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पासष्ट प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

सचिवांनी, अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ४८ ते ५६ सभागृहासमोर ठेवली.

श्री. देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्ष नेता) यांनी, श्री. मनसुख हिरेन यांच्या मृत्यूबाबत सभागृहाला माहिती दिली व यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

(दोन्ही पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २५ मिनिटांनी पुन्हा स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ५५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. देवेंद्र फडणवीस (विरोधी पक्ष नेता) यांनी श्री. मनसुख हिरेन यांच्या मृत्यूबाबतचा मुद्दा उपस्थित केला.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळेस बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ५८ मिनिटांनी पुन्हा स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून १३ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून १३ मिनिटांनी पुन्हा स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सदरील मुद्याबाबत माननीय विरोधी पक्षनेते व माननीय मुख्यमंत्री यांच्यात चर्चा झाली आहे तसेच याप्रकरणी संबंधित मंत्री निश्चितपणे उत्तर देतील असे सांगून माननीय तालिका सभाध्यक्षांनी सभागृहाची बैठक पुन्हा २ वाजेपर्यंत स्थगित करीत असल्याचे सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३२ मिनिटांनी पुन्हा स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजता पुन्हा सुरू झाली.

गृह मंत्र्यांनी, दादरा-नगर-हवेलीचे खासदार श्री. मोहन डेलकर यांनी मुंबईत केलेली आत्महत्त्या व श्री. मनसुख हिरेन यांच्या मृत्यूबाबत खुलासा केला.

श्री. देवेंद्र फडणवीस, (विरोधी पक्षनेता) तसेच सर्वश्री. नाना पटोले, भास्कर जाधव वि.स.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

२. विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे

सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५—महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

(क) कौशल्य विकास मंत्र्यांनी, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५—महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१ संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार, ॲड राहुल कुल, श्री. देवेंद्र फडणवीस यांचे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचे प्रस्ताव मतास टाकून असंमत झाले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

३. सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेला सुरूवात होईल. अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी आजचा पहिला व शेवटचा दिवस आहे. सदर चर्चेला एकूण ३ तासाचा वेळ देण्यात येईल. या ३ तासापैकी सत्तारुढ पक्षास माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षाला निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी प्रथेप्रमाणे चर्चेला सुरूवात करावी असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितरित्या घोषणा देतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थिती पाहता सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये सहभाग घ्यावयाचा नाही असे वाटत असल्यामुळे अर्थसंकल्पावरील चर्चा संपली असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी जाहीर केले.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्रितरित्या घोषणा देतात.)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक दुपारी १० मिनिटांकरीता स्थगित करीत असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ५६ मिनिटांनी पुन्हा स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.नाना पटोले वि.स.स. यांनी, मराठा आरक्षणाच्यासंदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयात ॲटर्नी जनरल यांनी मांडलेली भूमिका, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

सभागृहाची बैठक २० मिनिटांकरीता स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभाध्यक्षांनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ९ मिनिटांनी पुन्हा स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून २९ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहाची बैठक अर्ध्या तासाकरिता स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी

सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून २९ मिनिटांनी पुन्हा स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ५९ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१

१. (१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सत्तावीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(१) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी, "मराठा आरक्षण" बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

२. (१) कामगार मंत्र्यांनी, (क) कोल्हापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, कोल्हापूर यांचा सन २०१३-२०१४ ते २०१७-२०१८ या वर्षांचा वार्षिक, (ख) रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, रायगड यांचे सन २०१७-२०१८ व २०१८-२०१९ या वर्षांचा अनुक्रमे सोळावा व सतरावा वार्षिक अहवाल, (ग) कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, कोल्हापूर यांचा सन २०१३-२०१४ ते २०१६-२०१७ या वर्षांचा वार्षिक अहवाल, (घ) अकोला-वाशिम-बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला यांचा सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ या वर्षांचा वार्षिक अहवाल, (ङ) किराणा बाजार व दुकाने मंडळ (बृहन्मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन २०१५-२०१६ ते २०१८-२०१९ या वर्षांचा अनुक्रमे सेहेचाळीसावा, सत्तेचाळीसावा, अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल तसेच (च) पिंपरी-चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०१४-२०१५ ते २०१७-२०१८ या वर्षांचा अनुक्रमे तेविसावा, चोविसावा, पंचविसावा ते सव्विसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) जलसंपदा मंत्र्यांनी, (क) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल आणि (ख) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचा सन २०१७-२०१८ चा स्वतंत्र लेखापरीक्षा व त्यावरील अनुपालन अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(३) गृह राज्यमंत्र्यांनी, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये गृह विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवले.

(४) रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्र्यांनी, (क) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचा वार्षिक लेखे व लेखा परीक्षण अहवाल, (ख) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचा सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या वर्षांचा चव्वेचाळीसावा ते अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल, (ग) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल आणि (घ) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक लेखे व लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवले.

३. डॉ.संजय रायमुलकर, समिती प्रमुख यांनी पंचायती राज समितीचा पहिला, दुसरा, तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व आठवा अहवाल सभागृहास सादर केला.

४. श्री.कैलास गोरंट्याल, समिती प्रमुख यांनी विधानसभा आश्वासन समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर केला.

५. सचिवांनी, वि.स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचा सातवा अहवाल (२०१८-२०१९) सभागृहाच्या पटलावर ठेवला.

६. वने राज्यमंत्र्यांनी, "राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात आलेली विशेष मोहीम" या विषयावरील श्री.रमेश कोरगावकर व इतर वि.स.स. यांच्या दिनांक ३ मार्च, २०२१ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक २१८०९ वरील चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार याबाबत सविस्तर चौकशी करून अहवाल सभागृहास सादर करण्यासाठी माझ्या अध्यक्षतेखाली १६ विधानसभा सदस्यांची तदर्थ समिती घटित करण्यात यावी, असा प्रस्ताव मांडला व सदर समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश करण्यात यावा अशी सूचना मांडली:—

(१) श्री. दत्तात्रय भरणे, वने राज्यमंत्री

(२) श्री. नाना पटोले, वि.स.स.

(३) श्री. सुनील प्रभु, वि.स.स.

(४) श्री. उदयसिंह राजपूत, वि.स.स.

(५) श्री. बालाजी कल्याणकर, वि.स.स.

(६) ॲड. अशोक पवार, वि.स.स.

(७) श्री. माणिकराव कोकाटे, वि.स.स.

(८) श्री. सुनील भुसारा, वि.स.स.

(९) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(१०) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(११) श्री. अमित झनक, वि.स.स.

(१२) श्री. संग्राम थोपटे, वि.स.स.

(१३) ॲड. आशिष शेलार, वि.स.स.

(१४) श्री. नितेश राणे, वि.स.स.

(१५) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(१६) श्री. समीर कुणावार, वि.स.स.

(१७) श्री. नरेंद्र भोंडेकर, वि.स.स.

सदर समिती आपला अहवाल ४ महिन्यांच्या आत सभागृहाला सादर करील असे वने मंत्र्यांनी सांगितले.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

७. (१) श्री. देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्ष नेते यांनी, "श्री. अन्वय नाईक यांच्या प्रकरणासंबंधी सभागृहास दिशाभूल करणारी माहिती देणे" या विषयाबाबत माननीय गृहमंत्री श्री. अनिल देशमुख यांच्याविरुद्ध विशेषाधिकार भंगाची सूचना दिली असून त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

श्री. देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांनी उपरोक्त विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत थोडक्यात म्हणणे मांडले.

माननीय विरोधी पक्ष नेते श्री. देवेंद्र फडणवीस यांनी माननीय गृह मंत्री श्री. अनिल देशमुख यांच्याविरुद्ध मांडलेली हक्कभंगाची सूचना तपासून घेण्यात येईल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांनी, "शासकीय कार्यक्रमास निमंत्रित न करणे" या विषयाबाबत मौजे उमराणी येथील सरपंच, उप सरपंच व संबंधित अधिकारी यांच्याविरूद्ध

विशेषाधिकार भंगाची सूचना दिली असून सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. यांनी उपरोक्त विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत थोडक्यात म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना तपासून घेण्यात येईल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(१) श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. यांनी, "महाराष्ट्रातील हजारो साधू व संत यांना आधार कार्ड व रेशन कार्ड नसल्यामुळे लस देण्यात न येणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.अमिन पटेल, वि.स.स. यांनी आपले मत मांडले.

मंत्रिमहोदयांनी याची नोंद घ्यावी असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

(२) श्री.अबू आजमी, वि.स.स. यांनी, "मुस्लिम आरक्षण" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याची नोंद घ्यावी असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

८. उप मुख्यंमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, "अर्थसंकल्पातील अनुदानासाठीच्या मागण्यांवर चर्चा व मतदानाच्या संदर्भात महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम २५१ (१) मधील दहा दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी." इ.बाबतचा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

९. गृह विभाग, महसूल व वन विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नगर विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ग्रामविकास विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, नियोजन विभाग, गृहनिर्माण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, आदिवासी विकास विभाग, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मृद व जलसंधारण विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक बी-१, बी-२, बी-३, बी-४, बी-५, बी-६, बी-७, बी-८, बी-९,

बी-१०, बी-११, बी-१२, सी-१, सी-२, सी-४, सी-५, सी-६, सी-७, सी-९, सी-१०, सी-१२, डी-२, डी-३, डी-४, डी-५, डी-६, डी-७, डी-८, डी-९, डी-११, ई-२, ई-३, ई-४, ई-५, एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, एफ-८, एच-२, एच-३, एच-४, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९, एच-११, आय-२, आय-३, आय-४, आय-५, आय-७, के-१, के-३, के-४, के-५, के-६, के-७, के-८, के-९, के-१०, के-११, के-१३, एल-२, एल-३, एल-४, एल-५, एल-७, एल-८, एम-१, एम-२, एम-३, एम-४, एम-५, एम-६, एन-२, एन-३, एन-६, एन-४, एन-५, एन-७, एन-८, ओ-१, ओ-२, ओ-३, ओ-४, ओ-६, ओ-७, ओ-८, ओ-९, ओ-१४, ओ-१६, ओ-१८, ओ-२०, ओ-२२, ओ-२४, ओ-२६, ओ-२८, ओ-३०, ओ-३२, ओ-३४, ओ-३६, ओ-३८, ओ-४०, ओ-४२, ओ-४४, ओ-४६, ओ-४८, ओ-५०, ओ-५२, ओ-५४, ओ-५६, ओ-५८, ओ-६०, ओ-६२, ओ-६४, ओ-६६, ओ-६८, ओ-७०, ओ-७२, ओ-७४, ओ-७६, ओ-७८, ओ-८०, ओ-८२, ओ-८४, ओ-१०, ओ-११, ओ-१२, ओ-१३, ओ-१५, ओ-१७, ओ-१९, ओ-२१, ओ-२३, ओ-२५, ओ-२७, ओ-२९, ओ-३१, ओ-३३, ओ-३५, ओ-३७, ओ-३९, ओ-४१, ओ-४३, ओ-४५, ओ-४७, ओ-४९, ओ-५१, ओ-५३, ओ-५५, ओ-५७, ओ-५९, ओ-६१, ओ-६३, ओ-६५, ओ-६७, ओ-६९, ओ-७१, ओ-७३, ओ-७५, ओ-७७, ओ-७९, ओ-८१, ओ-८३, ओ-८५, क्यू-२, क्यू-३, क्यू-४, क्यू-६, आर-१, आर-२, आर-३, आर-४, एस-१, एस-२, एस-३, एस-४, एस-५, टी-२, टी-३, टी-४, टी-५, टी-९, टी-६, टी-८, टी-१०, टी-११, यू-२, यू-३, यू-४, यू-५, व्ही-२, व्ही-३, व्ही-५, व्ही-६, डब्ल्यू-२, डब्ल्यू-३, डब्ल्यू-४, डब्ल्यू-५, डब्ल्यू-६, डब्ल्यू-७, डब्ल्यू-८, डब्ल्यू-९, एक्स-१, एक्स-२, एक्स-३, एक्स-४, वाय-२, वाय-३, वाय-४, वाय-५, वाय-६, वाय-७, झेडडी-१, झेडडी-२, झेडडी-३, झेडडी-४, झेडडी-५, झेडडी-६, झेडजी-२, झेडजी-३, झेडजी-४, झेडजी-५, झेडएच-२, झेडएच-३, झेडएच-४, झेडएच-५, झेडएच-७, ए-१, ए-२, ए-३, ए-४, ए-५, ए-६, ए-७, ए-८, ए-९, ए-१०, जी-१, जी-२, जी-४, जी-५, जी-६, जी-७, जी-८, जी-१०, जे-१, जे-२, जे-३, जे-४, जे-५, पी-१, पी-२, पी-३, झेडए-२, झेडए-३, झेडए-४, झेडसी-१, झेडसी-२, झेडसी-३, झेडई-१, झेडई-२, झेडई-३, झेडएफ-१, झेडएफ-२, झेडएफ-३, झेडएफ-४, झेडएफ-५ चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील सदस्यांना टपाल खणाद्वारे वितरित केला असल्याचे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

कपात सूचना देण्याची मुदत सोमवार, दि. १५ मार्च, २०२१ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आली असल्याने मान्य कपात सूचनांची यादी सदस्यांना स्वतंत्रपणे वितरित करण्यात येईल असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले व मागण्यांवरील एकत्रित चर्चेची कार्यपद्धती विशद केली.

उपरोक्त विभागांच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री.सुधीर मुनगंटीवार
(२) श्री.रमेश कोरगावकर
(३) श्री.गणेश नाईक
(४) श्री.प्रकाश सोळंके
(५) श्री.राधाकृष्ण विखे-पाटील
(६) श्री.संग्राम थोपटे
(७) श्री. रईस शेख
(८) श्री. देवेंद्र फडणवीस
(९) श्री. दिलीप लांडे
(१०) श्रीमती सरोज अहिरे
(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर

उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी विभागांच्या एकत्रित चर्चेस उत्तर दिले.

१. गृह विभाग, २. महसूल व वन विभाग, ३. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, ४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, ५. नगरविकास विभाग, ६. सार्वजनिक बांधकाम विभाग, ७. जलसंपदा विभाग, ८. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ९. ग्रामविकास विभाग, १०. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ११. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, १२. नियोजन विभाग, १३. गृहनिर्माण विभाग, १४. सार्वजनिक आरोग्य विभाग, १५. वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, १६. आदिवासी विकास विभाग, १७. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १८. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, १९. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, २०. महिला व बालविकास विभाग, २१. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, २२. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, २३. इतर मागास बहुजन कल्याण विभाग, २४. मृद व जलसंधारण विभाग मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक १ : अनुक्रमे बी-१, बी-२, बी-३, बी-४, बी-५, बी-६, बी-७, बी-८, बी-९, बी-१०, बी-११, बी-१२, सी-१, सी-२, सी-४, सी-५, सी-६, सी-७, सी-९, सी-१०, सी-१२, डी-२, डी-३, डी-४, डी-५, डी-६, डी-७, डी-८, डी-९, डी-११, ई-२, ई-३, ई-४, ई-५, एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, एफ-७, एफ-८, एच-२, एच-३, एच-४, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९, एच-११, आय-२, आय-३, आय-४, आय-५, आय-७, के-१, के-३, के-४, के-५, के-६, के-७, के-८, के-९, के-१०, के-११, के-१३, एल-२, एल-३, एल-४, एल-५, एल-७, एल-८, एम-०१, एम-२, एम-३, एम-४, एम-५, एम-६, एन-२, एन-३, एन-६, एन-४, एन-५, एन-७, एन-८, ओ-१, ओ-२, ओ-३, ओ-४, ओ-६, ओ-७, ओ-८, ओ-९, ओ-१४, ओ-१६, ओ-१८, ओ-२०, ओ-२२, ओ-२४, ओ-२६, ओ-२८,

ओ-३०, ओ-३२, ओ-३४, ओ-३६, ओ-३८, ओ-४०, ओ-४२, ओ-४४, ओ-४६, ओ-४८, ओ-५०, ओ-५२, ओ-५४, ओ-५६, ओ-५८, ओ-६०, ओ-६२, ओ-६४, ओ-६६, ओ-६८, ओ-७०, ओ-७२, ओ-७४, ओ-७६, ओ-७८, ओ-८०, ओ-८२, ओ-८४, ओ-१०, ओ-११, ओ-१२, ओ-१३, ओ-१५, ओ-१७, ओ-१९, ओ-२१, ओ-२३, ओ-२५, ओ-२७, ओ-२९, ओ-३१, ओ-३३, ओ-३५, ओ-३७, ओ-३९, ओ-४१, ओ-४३, ओ-४५, ओ-४७, ओ-४९, ओ-५१, ओ-५३, ओ-५५, ओ-५७, ओ-५९, ओ-६१, ओ-६३, ओ-६५, ओ-६७, ओ-६९, ओ-७१, ओ-७३, ओ-७५, ओ-७७, ओ-७९, ओ-८१, ओ-८३, ओ-८५, क्यू-२, क्यू-३, क्यू-४, क्यू-६, आर-१, आर-२, आर-३, आर-४, एस-१, एस-२, एस-३, एस-४, एस-५, टी-२, टी-३, टी-४, टी-५, टी-९, टी-६, टी-८, टी-१०, टी-११, यू-२, यू-३, यू-४, यू-५, व्ही-२, व्ही-३, व्ही-५, व्ही-६, डब्ल्यू-२, डब्ल्यू-३, डब्ल्यू-४, डब्ल्यू-५, डब्ल्यू-६, डब्ल्यू-७, डब्ल्यू-८, डब्ल्यू-९, एक्स-१, एक्स-२, एक्स-३, एक्स-४, वाय-२, वाय-३, वाय-४, वाय-५, वाय-६, वाय-७, झेडडी-१, झेडडी-२, झेडडी-३, झेडडी-४, झेडडी-५, झेडडी-६, झेडजी-२, झेडजी-३, झेडजी-४, झेडजी-५, झेडएच-२, झेडएच-३, झेडएच-४, झेडएच-५, झेडएच-७, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

आता चर्चारोधानंतर असलेल्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक—

१. सामान्य प्रशासन विभाग, ए-१, ए-२, ए-३, ए-४, ए-५, ए-६, ए-७, ए-८, ए-९, ए-१० २. वित्त विभाग, जी-१, जी-२, जी-४, जी-५, जी-६, जी-७, जी-८, जी-१० ३. विधि व न्याय विभाग, जे-१, जे-२, जे-३, जे-४, जे-५४. संसदीय कार्य विभाग, पी-१, पी-२, पी-३५.कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, झेडए-२, झेडए-३, झेडए-४६.महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, झेडसी-१, झेडसी-२, झेडसी-३७. अल्पसंख्याक विकास विभाग, झेडई-१, झेडई-२, झेडई-३८, मराठी भाषा विभाग, झेडएफ-१, झेडएफ-२, झेडएफ-३, झेडएफ-४, झेडएफ-५, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

१०. पुरःस्थापनार्थ, विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

(१) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६— महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२१ मांडले व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड (१)

द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे असे सांगून सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून ३७ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक सायंकाळी ६ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन —पुढे सुरू

(२) ऊर्जा मंत्र्यांनी, "थकबाकीदार ग्राहकांची वीज जोडणी तोडणे" इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, "राज्यात मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करणे" इ.बाबत म.वि.स. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

माननीय उपाध्यक्षांनी, सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ ते बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१ या कालावधीत सभागृहात झालेल्या कामकाजासंबंधीचा आढावा सभागृहासमोर ठेवला.

महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी घेण्यात यावे, अशी शिफारस राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे असे माननीय उपाध्यक्षांनी सांगितले.

माननीय उपाध्यक्षांनी सत्र-समाप्तीसंबंधीचा माननीय राज्यपाल महोदयांचा पुढील संदेश सभागृहात वाचून दाखविला.

"मी भगतसिंह कोश्यारी, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उपखंड (क) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, याद्वारे बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१ रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानसभेचे सत्र संस्थगित करीत आहे."

यानंतर राष्ट्रगीत म्हणण्यात आले.

सायंकाळी ६ वाजून २७ मिनिटांनी विधानसभेचे सत्र संस्थगित झाले.

विवरण क्रमांक - ८

महाराष्ट्र विधानसभेच्या नियम ८ (१) अन्वये सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ रोजी नामनिर्देशित केलेली सभाध्यक्षांची तालिका :-

(१) श्री. संजय शिरसाट

(२) श्री. राजन साळवी, वि.स.स.,

(३) ॲड अशोक पवार

(४) श्री.संग्राम थोपटे

(५) श्री. कालिदास कोळंबकर

विवरण क्रमांक -९

विविध समित्यांवर/संस्थांवर/मंडळांवर/विद्यापीठांवर सदस्यांची निवडणूक व नामनियुक्ती

निरंक

विवरण क्रमांक - १०

विविध समित्यांच्या बैठकी

अ.क्र.	समितीचे नाव	बैठकीचा वार व दिनांक	बैठकीत झालेले कामकाज
(१)	(२)	(३)	(४)
(१)	कामकाज सल्लागार समिती	गुरुवार दि. १८ फेब्रुवारी, २०२१	विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार दि. १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी दुपारी ०३.३० वाजता मुंबई येथील विधान भवनाच्या प्रांगणात झाली. सदरहू बैठकीत समितीने सन २०२१ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासंबंधात संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनदर्शिकेवर विचारविनिमय करून पुढील निर्णय घेतले :- **निर्णय** १) कोविड - २०१९ विषाणूच्या प्रसाराच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाचे दिनांक १ मार्च ते ८ मार्च, २०२१ रोजीपर्यंतचे कामकाज निश्चित केले. २) सन्मा.सदस्य, अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी यांच्याकरिता RT-PCR कोरोना चाचणी सक्तीची करण्यात आली असून ती करण्याकरिता दिनांक २७ व २८ फेब्रुवारी, २०२१ रोजी तसेच, प्रत्येक आठवडयाच्या शुक्रवार, शनिवार व रविवारी विधान भवन, मुंबई येथे यासंदर्भात व्यवस्था करण्यात येईल. ३) विधान भवन, मुंबई येथे गर्दी होवू नये यासाठी सन्मा. सदस्यांचे स्वीय सहायक, वाहन चालक व सुरक्षा रक्षक यांची बसण्याची व्यवस्था बाहेरील तंबूमध्ये करण्यात यावी

अ.क्र.	समितीचे नाव	बैठकीचा वार व दिनांक	बैठकीत झालेले कामकाज
(१)	(२)	(३)	(४)
			४) विधान भवन, मुंबई येथे गर्दी होवू नये याकरिता मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांच्या सोबत एकाच अधिकाऱ्याला आत येण्याची परवानगी देण्यात यावी. अधिवेशन कालावधीत खाजगी व्यक्तिना प्रवेश नाकाराण्यात यावा. अधिवेशन कामकाजाकरिता विधान भवन येथे येणाऱ्या मंत्रालय अधिकारी/कर्मचारी यांना देखील मर्यादित स्वरुपात प्रवेश पास देण्यात यावेत. ५) विधानसभा सभागृहामध्ये सन्मा.सदस्यांकरिता आसन व्यवस्था करताना सामाजिक अंतर राखण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. ६) सन्मा, सदस्यांना कोरोना विषाणूंचा संसर्ग होऊ नये याकरिता त्यांना एक किट देण्यात यावी व त्यामध्ये एक फेस सिल्ड०, मास्क, हँडग्लोव्हज, सेनिटायझेशनची बॉटल इत्यादी वस्तू देण्यात याव्यात. ७) कोविड-१९ विषाणू प्रादूर्भावाची परिस्थिती विचारात घेवून, सभागृहाचे पुढील कामकाज ठरविण्यासाठी कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार, २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित करण्यात यावी.
(२)	कामकाज सल्लागार समिती	गुरुवार दि. २५ फेब्रुवारी, २०२१	विधानसभा कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार दि. २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी दुपारी ०४.०० वाजता मुंबई येथील विधान भवनाच्या प्रांगणात झाली. सदरहू बैठकीत समितीने सन २०२१ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासंबंधात संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनदर्शिकेवर विचारविनिमय करून पुढील निर्णय घेतले :-

अ.क्र.	समितीचे नाव	बैठकीचा वार व दिनांक	बैठकीत झालेले कामकाज
(१)	(२)	(३)	(४)
			निर्णय १) कोविड - २०१९ विषाणूच्या प्रसाराच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानसभेच्या आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाचे दिनांक १ ते १० मार्च २०२१ रोजीपर्यंतचे कामकाज निश्चित केले. २) संसदेच्या धर्तीवर शोक प्रस्ताव केवळ मा.अध्यक्ष यांच्याद्वारे मांडण्यात येईल व त्यावर कोणतीही चर्चा होणार नाही. ३) मंगळवार दि. २ मार्च ते अधिवेशन कालावधीत प्रश्नोत्तरे घेण्यात येतील व उर्वरित प्रश्न व्यपगत होतील. लक्षवेधी सूचना व अर्धा तास चर्चेच्या सूचना घेण्यात येणार नाहीत. ४) सन्मा.सदस्य, अधिकारी, कर्मचारी, सुरक्षा कर्मचारी यांच्याकरिता RT-PCR कोरोना चाचणी सक्तीची करण्यात आली असून ती करण्याकरिता दिनांक २७ व २८ फेब्रुवारी २०२१ रोजी व त्यानंतर अधिवेशनाच्या कालावधीतील प्रत्येक शनिवार व रविवार विधान भवन, मुंबई येथे यासंदर्भात व्यवस्था करण्यात येईल. ५) मा.अध्यक्ष यांच्या निवडणुकीचा दिनांक घोषित करण्याबाबत मा.उपाध्यक्ष यथोचित निर्णय घेतील. ६) विधान भवन, मुंबई येथे गर्दी होऊ नये यासाठी सन्मा. सदस्यांचे स्वीय सहायक, वाहन चालक व सुरक्षा रक्षक यांची बसण्याची व्यवस्था बाहेरील तंबूमध्ये करण्यात यावी

अ.क्र.	समितीचे नाव	बैठकीचा वार व दिनांक	बैठकीत झालेले कामकाज
(१)	(२)	(३)	(४)
			७) विधान भवन, मुंबई येथे गर्दी होऊ नये याकरिता मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांच्या सोबत एकाच अधिकाऱ्याला आत येण्याची परवानगी देण्यात यावी. अधिवेशन कालावधीत खाजगी व्यक्तींना प्रवेश नाकाराण्यात यावा. अधिवेशन कामकाजाकरिता विधान भवन येथे येणाऱ्या मंत्रालय अधिकारी/कर्मचारी यांना देखील मर्यादित स्वरूपात प्रवेश पास देण्यात यावेत. ८) विधानसभा सभागृहामध्ये सन्मा. सदस्यांकरिता आसन व्यवस्था करतांना सामाजिक अंतर राखण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. ९) सन्मा. सदस्यांना कोरोना विषाणूंचा संसर्ग होऊ नये याकरिता त्यांना एक किट देण्यात येणार त्यामध्ये एक फेस सिल्ड, मास्क, हँडग्लोव्हज, हँड सेनिटायझेशनची बॉटल इत्यादी वस्तू देण्यात याव्यात.
(३)	अंदाज समिती	२ मार्च २०२१	समितीच्या पहिल्या व दुसऱ्या अहवालाचे प्रारुप समंत करण्यात आले.

विवरण क्रमांक ११
शासकीय विधेयकासंबंधी सांख्यिकीय माहिती
सन २०२१ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरः-स्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव	विधान-सभेत संमत झाल्याचा दिनांक	विधान-परिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचवि-णाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधि-नियम क्रमांक	शेरा
१.	सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा व विधिग्राह्यी-करण) विधेयक, २०२१.	महसूल	श्री. बाळा-साहेब थोरात	२ मार्च २०२१	२ मार्च २०२१	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	३ मार्च २०२१	४ मार्च २०२१				सन २०२१ चा महा. अधि-नियम क्र. १	
२.	सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०२१.	नगर विकास	श्री. एकनाथ शिंदे	२ मार्च २०२१	२ मार्च २०२१	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	३ मार्च २०२१	४ मार्च २०२१					

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरः-स्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव	विधान-सभेत संमत झाल्याचा दिनांक	विधान-परिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचवि-णाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधि-नियम क्रमांक	शेरा
३.	सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२१.	वित्त	श्री. अजित पवार	४ मार्च २०२१	४ मार्च २०२१	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	४ मार्च २०२१	४ मार्च २०२१					
४.	सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०२१	नगर विकास	श्री. एकनाथ शिंदे	४ मार्च २०२१	४ मार्च २०२१	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	५ मार्च २०२१	९ मार्च २०२१					

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरः-स्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव	विधान-सभेत संमत झाल्याचा दिनांक	विधान-परिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचवि-णाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधि-नियम क्रमांक	शेरा
५.	सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ - महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१	कौशल्य विकास	श्री. नवाब मलिक	५ मार्च २०२१	५ मार्च २०२१	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	९ मार्च २०२१	१० मार्च २०२१					
६.	सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२१	वित्त	श्री. अजित पवार	१० मार्च २०२१	१० मार्च २०२१	विचारात घ्यावे, खंडशः विचारात घ्यावे, संमत करण्यात यावे. (संमत)	१० मार्च २०२१	१० मार्च २०२१					

अ. क्र.	विधेयकाची संज्ञा आणि क्रमांक	विभाग	प्रभारी मंत्री	पुरः-स्थापनेचा दिनांक	असाधारण राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचा दिनांक	पुरःस्थापित झालेल्या विधेयका-संबंधी प्रस्ताव	विधान-सभेत संमत झाल्याचा दिनांक	विधान-परिषदेत संमत झाल्याचा दिनांक	दुरुस्ती सुचवि-णाऱ्या सदस्यांची संख्या	दुरुस्त्यांची एकूण संख्या	मांडण्यात आलेल्या दुरुस्त्यांची संख्या	अधि-नियम क्रमांक	शेरा
७.	सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०२१.	वैद्यकीय शिक्षण	श्री. अमित देशमुख										सूचना म. वि. स. नियम २० अन्वये व्यपगत करण्यात आली.

विवरण क्रमांक - १२

संविधान सुधारणेच्या अनुसमर्थनाचा प्रस्ताव.

निरंक

विवरण क्रमांक - १३

पुरःस्थापित अशासकीय विधेयके

(१) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री. अतुल भातखळकर, श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे

(२) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री.अतुल भातखळकर, श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे

(३) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उत्तरदायित्व व देखभाल यासबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० - श्री.अमित साटम, श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे

(४) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ - महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक २०२० - श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे

(५) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ - महाराष्ट्र राज्यात लैंगिक अपराधास प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिराती फलक लावण्यास तसेच यासंदर्भातील अनेक संकेतस्थळांवर व समाजमाध्यमांवर प्रतिबंध करण्यास तरतूद करण्यासाठी विधेयक, २०२० - श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे

(६) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १४ - महाराष्ट्र वेश्म मालकी (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२० - श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे

(७) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २० - जमिन महसूलाच्या माफीबाबत (क्रमांक १) (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे

(८) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २१ - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) (सुधारणा) विधेयक २०२० - श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे

(९) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ - राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० - श्री. प्रकाश आबिटकर, श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांचे

(१०) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक २०२० - श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे

(११) सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२० - श्री.सुनील प्रभू, वि.स.स. यांचे

विवरण क्रमांक - १४

विचारात घेण्यात आलेले अशासकीय विधेयक

निरंक

विवरण क्रमांक - १५

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) व म.वि.स. नियम १५९ (२) अन्वये अध्यादेश नापसंत करण्यासंबंधी प्रस्ताव

निरंक

विवरण क्रमांक १६

विवरण क्रमांक

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२०-२०२१ च्या पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी मागण्या मंजूर झाल्या.

पुरवणी मागण्यांवर चर्चेसाठी प्राथम्यक्रमात असलेले विभाग

अ.क्र (१)	विभागाचे नाव (२)	एकूण मागण्या (३)	मागण्यावर चर्चा व मतदानाचा दिनांक (४)
(अ)			दिनांक ४ मार्च, २०२१
१)	गृह विभाग	३	
२)	महसूल व वन विभाग	३	
३)	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग	४	
४)	नगर विकास विभाग	१	
५)	वित्त विभाग	२	
६)	सार्वजनिक बांधकाम विभाग	३	
७)	जलसंपदा विभाग	१	
८)	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग	२	
९)	ग्रामविकास विभाग	२	
१०)	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	१	
११)	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	१	
१२)	सार्वजनिक आरोग्य विभाग	१	
१३)	आदिवासी विकास विभाग	१	
१४)	महिला व बालविकास विभाग	१	
	एकूण	२६	

(ब) दिनांक ४ मार्च २०२१ रोजी चर्चारोधानंतर मतास टाकण्यात आलेल्या पुरवणी खर्चाच्या मागण्या

अ.क्र	विभागांची नावे	एकूण मागण्या
१.	सामान्य प्रशासन विभाग	१
२.	शालेय शिक्षण विभाग	१
३.	विधी व न्याय विभाग	१
४.	वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग	२
५.	उच्च व तंत्रशिक्षण विभाग	१
६.	कौशल्य विकास व उद्योजकता विभाग	१
	एकूण मागण्या	**७**
एकूण : (अ) २६ + (ब) ०७ = ३३		

विवरण क्रमांक - १७

सन २०२०-२०२१ चे पुरवणी खर्चाच्या मागण्यांवरील कपात सूचना

अ.क्र.	विभाग	एकूण	मान्य	अमान्य	चर्चा व मतदानाचा दिनांक
(१)	(२)		(३)		(४)
१)	गृह विभाग	१६	१०	६	
२)	महसूल व वन विभाग	११	४	७	दि. ४ मार्च, २०२१
३)	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग	११	७	४	
४)	नगर विकास विभाग	१२	२	१०	
५)	वित्त विभाग	३	२	१	
६)	सार्वजनिक बांधकाम विभाग	२८	१३	१५	
७)	जलसंपदा विभाग	५	४	१	
८)	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग	५	५	०	
९)	ग्रामविकास विभाग	१५	७	८	
१०)	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	३	१	२	
११)	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	०	०	०	
१२)	सार्वजनिक आरोग्य विभाग	५	२	३	
१३)	आदिवासी विकास विभाग	२	१	१	
१४)	महिला व बालविकास विभाग	४	४	०	
	एकूण	**१२०**	**६२**	**५८**	

अ.क्र.	प्राथम्यक्रमात नसलेल्या विभागांची नावे	
१)	सामान्य प्रशासन विभाग	सदर विभाग प्राथम्यक्रमात नसल्यामुळे त्या विभागांवर कपात सूचना स्विकारण्यात आल्या नाहीत.
२)	शालेय शिक्षण विभाग	
३)	विधी व न्याय विभाग	
४)	वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग	
५)	उच्च व तंत्रशिक्षण विभाग	
६)	कौशल्य विकास व उद्योजकता विभाग	

विवरण क्रमांक - १८

पुरवणी विनियोजन विधेयकावरील मुद्दे.

सन २०२० - २०२१ च्या पुरवणी विनियोजन विधेयक

(पुरवणी विनियोजन विधेयक दिनांक ४ मार्च २०२१ रोजी संमत झाले)

पुरवणी विनियोजन विधेयकावरील मुद्दे

सदस्याचे नाव	स्वीकृत	अस्विकृत	एकूण
श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.	८	०	८
श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.	२	०	२
एकूण	१०	०	१०

विवरण क्रमांक - १९

अध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स. नियम ११ अन्वये)

निरंक

विवरण क्रमांक - २०

उपाध्यक्षांना पदावरुन दूर करण्याबाबतचा प्रस्ताव

निरंक

विवरण क्रमांक २१

मंत्रिमंडळावर विश्वास व्यक्त करण्याबाबतचा प्रस्ताव

(म.वि.स. नियम २३ अन्वये)

निरंक

विवरण क्रमांक २२

एखाद्या व्यक्तीविरुद्ध करावयाच्या अभिकथनासंबंधी दिलेल्या सूचना

(म.वि.स. नियम ३५ अन्वये)

निरंक

विवरण क्रमांक २३

म.वि.स. नियम ४७ अन्वये मंत्र्यांनी केलेली निवेदने

अ.क्र. (१)	मंत्री (२)	विषय (३)	सभागृहात निवेदन केल्याची तारीख (४)
१.	डॉ. नितीन राऊत, मा. ऊर्जा मंत्री	दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजी मुंबई महानगराचा विदयुत पुरवठा खंडित होणे	३ मार्च, २०२१
२.	श्री. अनिल देशमुख, मा. गृह मंत्री	जळगाव येथील महिला वसतिगृहामधील महिलांना पोलीसांनी नग्न होऊन नृत्य करण्यास सांगणे	४ मार्च, २०२१
३.	श्री. अनिल देशमुख, मा. गृह मंत्री	गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादयांचा शस्त्रास्त्रांचा कारखाना पोलीसांनी उध्वस्त करणे	५ मार्च, २०२१
४.	श्री. अनिल देशमुख, मा. गृह मंत्री	मनसुख मिस्त्रीलाला हिरेन यांच्या गुढ मृत्यूची चौकशी करणे	८ मार्च, २०२१
५.	श्री. अशोक चव्हाण, मा. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री	मराठा आरक्षणाबाबत	१० मार्च, २०२१
६.	डॉ. नितीन राऊत, मा. ऊर्जा मंत्री	थकबाकीदार ग्राहकांची वीज जोडणी तोडण्यासंदर्भात	१० मार्च, २०२१
७.	श्री. उदय सामंत, मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री	राज्यात मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करणे	१० मार्च, २०२१

विवरण क्रमांक २४

वैयक्तिक स्पष्टीकरण

(म.वि.स. नियम ४८ अन्वये)

निरंक

विवरण क्रमांक २५
नियम स्थगित करण्याबाबतचा प्रस्ताव
(म.वि.स. नियम ५७ अन्वये)

एकूण प्राप्त झालेले प्रस्ताव १५
मान्य झालेले प्रस्ताव --
अमान्य झालेले प्रस्ताव १५

अ.क्र.	दिनांक	सदस्यांचे नाव	विषय	मान्य/ अमान्य
१.	३ मार्च २०२१	देवेंद्र फडणवीस, वि.स.स.	"कोरडवाहू पिकांसाठी हेक्टरी रुपये २५,००० व बागायती पिकांसाठी हेक्टरी रुपये ५०,००० मदत देण्याच्या घोषणा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिल्यानंतर प्रत्यक्षात मात्र शासनाने शेतकऱ्यांची निराशा करणे, महात्मा फुले कर्जमाफी योजनेमध्ये देण्यात आलेल्या कर्जमाफीपासून राज्यातील अनेक पात्र शेतकरी अद्यापही वंचित असणे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याची शासनाची घोषणा प्रलंबित असणे, कोरोना संकटामुळे समाजातील अन्य वर्गाबरोबरच शेतकऱ्यांचेही आर्थिक नुकसान होणे, अशातच अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले असणे, माहे फेब्रुवारी ते मे, २०२० या कालावधीतील गारपीटीसाठी दिलेली नुकसान भरपाई अत्यंत विलंबाने व तुटपुंजी असणे, मागील वर्षात खरीप हंगामात अतिवृष्टी तसेच मावा, तुडतुडा, बोंडअळी व बोंडसडीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले असणे, याबाबतची कोणतीच नुकसान भरपाई शेतकऱ्यांना अद्यापही मिळालेली नसणे, शेतमालाला भाव मिळत नसणे, कापूस, तूर खरेदी केंद्रे सुरू करण्यास होत असलेला विलंब, पीक कर्जे देण्यास बँका विलंब करित असणे, प्रथम बोगस बियाणांमुळे करावी लागलेली दुबार पेरणी त्यानंतर अतिवृष्टी व पिकांवर पडलेले रोग यामुळे शेतकऱ्यांचे खरीप हंगामात झालेल्या नुकसानाची	अमान्य

अ.क्र.	दिनांक	सदस्यांचे नाव	विषय	मान्य/ अमान्य
			नुकसानभरपाई रब्बी हंगामात भरून काढण्याचा शेतकरी प्रयत्न करित असणे, त्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात गहू, हरभरा, तूर, वाटाणा, ज्वारी, लाखोरी, जवस यासारख्या कडधान्ययुक्त पिकांची लागवड केली असणे, त्याशिवाय फळपिके व भाजीपाला पिकांचीही लागवड केली असणे, मात्र अचानक वातावरणात बदल घडून अवकाळी पाऊस झाल्याने पिकांचे नुकसान होणे, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ पासून तीन ते चार दिवस राज्यात अवकाळी पाऊस होणे, मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्याच्या अनेक भागात सलग दोन दिवस गारपिटीसह पाऊस होणे, मध्य व पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे या जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसासह गारांचा पाऊस पडणे, विदर्भातील नागपूर, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यातही अवकाळी पाऊस होणे, कोकणातही पावसामुळे शेतकऱ्यांच्या गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा या पिकांचे नुकसान झाले असणे, अनेक ठिकाणी पावसामुळे पिकांचे नुकसान झाले असणे, आंब्याचा मोहरही गळून पडलेला असणे, द्राक्षे, टरबूज, खरबूज या पिकांचेही नुकसान झालेले असणे, मागील वर्षी झालेल्या नुकसानभरपाईचे पैसे अद्यापही हाती येण्यास अवकाश असणे, अशा परिस्थितीत पुन्हा उद्‌भवलेल्या संकटामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होणे, नुकसान भरपाईचे पंचनामे तातडीने करण्याबाबत शेतकऱ्यांकडून मागणी होत असणे, किमान यावेळी तरी शेतकऱ्याला प्रति हेक्टर अर्थसहाय्य करण्याची गरज असणे, राज्यातील शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत प्राप्त झालेली उपरोक्त सूचना म.वि.स. नियम ५७ च्या निकषात नसल्यामुळे सदरहू सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.	

अ.क्र.	दिनांक	सदस्यांचे नाव	विषय	मान्य/ अमान्य
२.	५ मार्च, २०२१		मी म.वि.स. नियम ५७ अन्वये पुढील प्रमाणे सूचना देऊ इच्छितो."ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम,१९६१ मध्ये सुधारणा करून कलम १२ (२)(a)(b) अन्वये अनुसूचित जाती व जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्यात येणे व कलम १२ (२)(c) अन्वये इतर मागासवर्गीय समाजाला २७ टक्के आरक्षण सन १९९४ मध्ये देण्यात येणे, ज्याअर्थी, सदर आरक्षण देताना इतर मागासवर्गीय समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याविषयीच्या तपशिलात न जाता २७% आरक्षण दिले गेल्याने तसेच सदर आरक्षण के.कृष्णमूर्ती प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाच्या न्यायनिर्णयामध्ये नमूद केल्यानुसार आरक्षणाच्या ५० टक्के मर्यादेपेक्षा अधिक होत असल्याने त्याला सर्वोच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले असणे, ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण दिले गेले नसल्याने, दिनांक ३१ जुलै, २०१९ रोजी तत्कालीन शासनाने अध्यादेश निर्गमित करून लोकसंख्येच्या प्रमाणात इतर मागासवर्गीय समाजाला आरक्षण देण्यात येईल अशी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमामध्ये तसेच ग्रामपंचायत अधिनियमामध्ये सुधारणा करणे, ज्याअर्थी, सदर अध्यादेशाचे अधिनियमात रूपांतर करण्याच्या दृष्टीने किंवा नव्याने विधेयक आणण्याच्या दृष्टीने विद्यमान सरकारने कोणतेही प्रयास न केल्याने सदर सुधारणा व्यपगत होणे,ज्याअर्थी, राज्य शासनाने इतर मागासवर्गीयांच्या मागासलेपणाबाबत अभ्यास करण्यासाठी विनिर्दिष्ट आयोग स्थापन करून या आयोगाच्या शिफारशींच्या आधारे लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देण्यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, यासंदर्भात गेल्या पंधरा महिन्यात शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे,	अमान्य

अ.क्र.	दिनांक	सदस्यांचे नाव	विषय	मान्य/ अमान्य
			ज्याअर्थी, याचा परिणाम म्हणून काल दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने एका याचिकेदरम्यान निर्णय देताना राज्यातील वाशीम, भंडारा,अकोला, नागपूर व गोंदिया या जिल्ह्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांमधील इतर मागास प्रवर्गामधून निवडून आलेल्या उमेदवारांच्या निवडणूका रद्दबातल केलेल्या असणे, तसेच या जागा खुल्या प्रवर्गातून भरण्याचे आदेश दिलेले असणे, ज्याअर्थी, सध्या जरी याचिकेशी संबंधित ५ जिल्ह्यांपुरता याचा परिणाम झाला असला तरी हा निर्णय राज्यात सर्वत्रच लागू झालेला असणे, त्यामुळे राज्यातील इतर मागासवर्गीय समाजामध्ये असंतोष निर्माण होणे, शासनाच्या नाकर्त्या भूमिकेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणावर परिणाम होणे, ज्याअर्थी, राज्य शासनाने पंधरा महिन्यांच्या काळात विनिर्दिष्ट आयोग नेमून, त्याद्वारे इतर मागासवर्गीयांच्या लोकसंख्येचा अभ्यास करून, त्या आधारावर स्थानिका स्वराज्य संस्थांमधील आरक्षण निश्चित केले असते, तर आज आरक्षण गमावण्याची वेळ आली नसती अशी भावना राज्यभर इतर मागासवर्गीयांमधून व्यक्त होत असणे, ज्याअर्थी, आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात मराठा समाजाला तत्कालीन सरकारने अभ्यासपूर्वक आरक्षण देऊन न्यायालयीन प्रक्रियेतही ते टिकवणे,सध्या ते सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असणे, मात्र सरकारच्या अशा उदासीन व असंवेदनशील भूमिकेमुळे इतर मागासवर्गांच्या या आरक्षणासारखेच मराठा आरक्षणही हातचे जाते की काय अशी शंका समाजमनात निर्माण झालेली असणे, त्याअर्थी, इतर मागास वर्ग समाजाच्या आरक्षणासाठी न्यायालयीन प्रक्रियेच्या माध्यमातून शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना, यासाठी या विषयावर तातडीने चर्चा करण्यात यावी व त्यासाठी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यात यावा “	

अ.क्र.	दिनांक	सदस्यांचे नाव	विषय	मान्य/ अमान्य
३	८ मार्च, २०२१	श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.	"पिंपळनेर (ता. साक्री, जि.धुळे) येथील अपर तहसील कार्यालयात सेतू ऑपरेटर म्हणून काम करणाऱ्या एका महिलेने अपर तहसीलदार विनायक थविल व त्याचा हस्तक संदीप वाणी यांचेविरुद्ध पिंपळनेर पोलीस स्टेशनमध्ये भा.दं.वि. कलम ३५४ अ अन्वये दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी फिर्याद दाखल केलेली असणे, या फिर्यादीत 'सदर अपर तहसीलदार हे त्यांचा हस्तक श्री.संदीप वाणी याच्यामार्फत निरोप पाठवून कोणत्या ना कोणत्या कारणाने मला एकटीला घरी बोलावतात, त्यांची मागणी पूर्ण न केल्यास तुझ्या सेतू केंद्राबाबत नियमबाह्य नोटिसा काढून तुला मानसिक व शारीरिक त्रास देतात दिनांक २६ फेब्रुवारी २०२१ रोजी त्यांच्या केबिनमध्ये बोलावून माझे काम न केल्यास तुझे सेतू केंद्र एकांतात हलवतो त्याशिवाय तू माझे काम करणार नाही असे सांगून हात धरून पदर ओढण्याचा प्रयत्न केला असता मी केबिनच्या बाहेर पळ काढला यास्तव तहसिलदार करत असलेल्या माझ्या अशा बदनामीमुळे माझे कुटुंब उद्ध्वस्त होईल व मला आत्महत्येशिवाय पर्याय उरणार नाही' अशी विधाने नोंदविली असणे, जबाबदार पदावर असणाऱ्या शासकिय अधिकाऱ्याने महिला कर्मऱ्याच्या बाबतीत केलेले हे वर्तन अतिशय गंभीर असणे, यासाठी अशा अधिकाऱ्यावंर वचक बसणे तसेच आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर समाजामध्ये चांगला संदेश देण्यादृष्टीने सदर अधिकाऱ्याला तातडीने निलंबित करून त्याच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता शासनाने या प्रकरणी करावयाची कार्यवाही व उपाययोजना.	अमान्य
४	८ मार्च, २०२१	श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.	मी म.वि.स. नियम ५७ अन्वये पुढील प्रमाणे सूचना देऊ इच्छितो. "रेखा हेमराज वाणी या महिलेला दिनांक २७ जानेवारी,२०२१ रोजी कुरार पोलीसांनी अटक केलेली असणे, त्यांना भायखळा कारागृह येथे आणण्यात आलेले असणे, दिनांक २ मार्च, २०२१रोजी त्यांचा पोलीसांच्या अमानुष मारहाणीमुळे भायखळा कारागृह येथे मृत्यू झालेला असणे, याप्रकरणी अखिल भारतीय राजपूत भामटा युवक आघाडी या संघटनेने मा. मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ५	अमान्य

अ.क्र.	दिनांक	सदस्यांचे नाव	विषय	मान्य/ अमान्य
अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			आणला असता ठाणे अंमलदार यांनी फिर्याद घेण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर मा.पोलीस अधीक्षक सो यांनादेखील दखलपात्र गुन्ह्याबाबत माहिती दिलीअसता सन्माननीय सदस्यांना उडवाउडवीची उत्तरे मिळाली व सन्माननीय सदस्य स्वतः पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यासाठी गुटखा असलेल्या वाहनासह गेले असता फिर्याद नोंदवून घेतली नाही व जिल्हा पेठ पोलीस ठाणे येथील श्री.अकबर पटेल यांनी सन्माननीय सदस्य यांचा मान न ठेवता अरेरावाची भाषा वापरुन अर्वाच्यपणे सन्माननीय सदस्यांना अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.		
१०.	२२	श्री.चंद्रकांत निंबा पाटील. वि.स.स. दिनांक १० नोव्हेंबर २०२०	श्रीमती श्वेता चंदन्मल संचेती (नोडल अधिकारी), तहसीलदार, मुक्ताईनगर यांच्याविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्य यांच्या मुक्ताईनगर विधानसभा मतदार संघामध्ये माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये डेंगूची साथ पसरल्यामुळे तसेच दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२० रोजी तालुक्यातील बोरखेड जुने येथे कोरोनाचे रुग्ण आढळून आल्याने सन्माननीय सदस्य यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने अधिकृत माहिती घेण्यासाठी नोडल अधिकारी असलेल्या मुक्ताईनगरच्या तहसीलदार श्रीमती श्वेता चंदन्मल संचेती यांना		विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडे चौकशी करण्यास्तव पाठविण्यात आली. दिनांक ४ फेब्रुवारी २०२१

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			दिनांक २ नोव्हेंबर, २०२० रोजी दुपारी ३-५० वाजता दोन वेळेस व दुपारी ४-२२ वाजता एक वेळेस म्हणजेच तीन वेळा त्यांच्या भ्रमणध्वनीद्वारे त्यांच्याशी संपर्क साधला असता श्रीमती श्वेता चंदन्मल संचेती यांनी सन्माननीय सदस्य यांच्या भ्रमणध्वनीची नोंद असतानाही त्यांच्याशी हेतुपुरस्सर संपर्क टाळल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.		चौकशी अहवाल प्राप्त
११.	२४	श्री. अमीत भास्कर साटम, वि.स.स. दिनांक २४ नोव्हेंबर २०२०	**श्री. भरत मराठे, सह आयुक्त- झोन-४ बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याविरुद्ध** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, जुहू येथे मोरारजी नावाच्या शाळेच्या जमिनीवर अनधिकृत बांधकाम सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याने सदर विषयासंदर्भात श्री. भरत मराठे, सह आयुक्त- झोन-४ बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सोबत दिनांक २३ नोव्हेंबर, २०२० रोजी के/पश्चिम विभाग कार्यालयामध्ये सहायक आयुक्त के/पश्चिम, सबंधित अधिकारी स्थानिक नागरिक संघटनेचे सदस्य, स्थानिक नगरसेविका श्रीमती रेणू हंसराज तसेच सन्माननीय विधानसभा सदस्य यांच्या सोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीत श्री. भरत मराठे यांनी अनधिकृत बांधकामाला मदत होईल अशी भूमिका मांडली व महानगरपालिकेने अनधिकृत बांधकाम		सूचना मा. मुख्य सचिव यांच्याकडे चौकशी करण्यास्तव पाठविण्यात आली. दिनांक १७ डिसेंबर २०२० चौकशी अहवाल अप्राप्त.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			विरोधात पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यासाठी पत्र दिले असतानाही गुन्हा नोंदविण्यास नकार दिला. तसेच श्री. भरत मराठे यांनी " मी तुम्हाला माझा हिस्का दाखवील. आपण अनधिकृत बांधकाम संदर्भात तक्रारी आमदार म्हणून माझ्याकडे का घेऊन येता? आपण इतर विषय माझ्याकडे आणावेत व अनधिकृत बांधकाम हे विषय मांडू नये. आपण प्रशासनामध्ये ढवळाढवळ करत आहात. Dont underestimate Me तुम्ही माझ काय वाकडं करणार ? मला रिटायर्डमेंटला फक्त १ वर्ष बाकी आहे. त्यामुळे मला कोणाची फिकीर नाही अनेक लोकप्रतिनिधी व निवडणुका मी बघितलेल्या आहेत. तुम्ही सदर विषय विधानसभेत मांडलात तरी मला काहीही फरक पडत नाही.," अशा अपशब्दाचा वापर करून सन्माननीय सदस्यांना अपमानास्पद वागणूक दिल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.		
१२.	२५	श्री.रईस शेख, वि.स.स.	**श्री. मिलिंद पळसुले, जनसपंर्क अधिकारी, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्याविरुद्ध** सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्य यांच्या भिवंडी शहरातील व विशेषतः सन्माननीय सदस्य यांच्या १३७, भिवंडी पूर्व मतदारसंघामध्ये दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२० रोजी प्रभाग समिती क्र. ३, पद्मानगर येथे राष्ट्रीय नागरी		सूचना मा. मुख्य सचिव यांच्याकडे चौकशी करण्यास्तव पाठविण्यात आली.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
		दिनांक ११ नोव्हेंबर २०२०	आरोग्य अभियान अंतर्गत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकामार्फत आरोग्य केंद्राचे भूमिपूजन कार्यक्रम तसेच पटेल कंपाऊंड, जिलानी इमारत दुर्घटनाग्रस्त मयत रहिवासी यांचे वारस व जखमी यांना धनादेश वाटप (आर्थिक मदतनिधी) आणि प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाची सुरूवात असे तिन्ही शासकीय कार्यक्रमासंबंधी जनसंपर्क अधिकारी यांनी निमंत्रण पत्रिका जाहीर केली होती. भिवंडी पूर्व मतदासंघातील शासकीय काम होत असलेल्या जाहिरातीमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने सन्माननीय सदस्यांचे नावाचे उल्लेख अनिवार्य असून त्यांची उपस्थिती देखील महत्त्वाची होती. परंतु, सन्माननीय सदस्यांचे निमंत्रण पत्रिकेत नाव वगळून भिवंडी तालुक्यातील खासदार, भिवंडी पश्चिम आमदार, महापौर, नगरसेवक इत्यादी सर्व लोकप्रतिनिधींच्या नावाचा उल्लेख असल्याने यासंदर्भात स्थानिक नागरिक आणि समाजवादी पक्षाच्या नेतेगणांनी श्री. मिलिंद पळसुले, जनसपंर्क अधिकारी, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांच्याकडे या विषयासंदर्भात विचारपूस केली असता सदरचा कार्यक्रम अपरिहार्य कारणामुळे मनपाने पुढे ढकल्याचे पत्र त्यांनी निर्गमित केले. मात्र, सदरचा कार्यक्रम ठरल्याप्रमाणे सन्माननीय सदस्य यांच्या अनुपस्थितीत पार पाडण्यात आल्यामुळे झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.		दिनांक १ मार्च २०२१

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			सन २०२० चे चतुर्थ अधिवेशन		
१३.	२७	श्री. विकास ठाकरे, वि.स.स. दिनांक ११ डिसेंबर २०२०	**श्री. अजय आंबेकर, महासंचालक माहिती व जनसंपर्क व संचालक माहिती व जनसंपर्क यांच्याविरुद्ध** सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्य यांच्या दिनांक २१.१२.२०१९ व दिनांक ०६.०२.२०२० चे पत्रान्वये महासंचालक मा.व.ज. यांना मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या जाहिरात कंत्राटदारामार्फत प्रसिद्धीच्या कामात गैरप्रकार झाल्याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत विचारले असता श्री. अजय आंबेकर, संचालक (माहिती व प्रशासन) यांनी या संदर्भात कुठलाही चौकशी अहवाल प्राप्त झाला नाही असे संदर्भांकित दिनांक ०४.०३.२०२० च्या पत्रान्वये कळविले. तथापि, श्री.अजय आंबेकर यांनी या तक्रारीचे संदर्भात राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे तक्रारीची चौकशी करून अहवाल सादर करण्यास कळविले असता, सदर तक्रारींची चौकशी उपमुख्य सुरक्षा व दक्षता विभाग, म.रा. मार्ग परिवहन यांनी चौकशी करून अहवाल दिनांक १९.१०.२०१९		सूचना मा. मुख्य सचिव यांच्याकडे चौकशी करण्यास्तव पाठविण्यात आली. दिनांक ८ फेब्रुवारी २०२१ चौकशी अहवाल अप्राप्त.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			रोजीचे व्यवस्थापकीय संचालक रा.प. महामंडळ यांना सादर करून अहवाल व्यवस्थापकीय संचालक यांनी दिनांक ०१.११.२०१९ रोजीचे महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांना सादर केला होता व त्यांनी असा काहीही चौकशी अहवाल रा.प.महामंडळाकडून प्राप्त झाला नाही असे खोटे उत्तर सन्माननीय सदस्यांना महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांचेकडून संदर्भांकित पत्र क्र. १ अन्वये दिनांक ०४.०३.२०२० च्या पत्रान्वये दिले व ते पत्र सारासार खोटे असून सन्माननीय सदस्यांची दिशाभूल करणारे असल्यामुळे झालेला सन्माननीय विधानसभा सदस्य यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय.		
१४.	२८	श्री.रवि राणा, वि.स.स. दिनांक २४ नोव्हेंबर २०२०	**पोलीस आयुक्त, अमरावती, पोलीस आयुक्त, मुंबई व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, अमरावती यांच्याविरुद्ध** सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, संपूर्ण राज्यामध्ये ओला दुष्काळ जाहिर करण्यात येऊन अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना प्रती हेक्टर ५०,००० हजार रुपये नुकसान भरपाई, शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाऊ नये म्हणून नुकसान भरपाईची रक्कम त्यांच्या बँक खात्यात		

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			दिवाळीपूर्वी जमा करावी व टाळेबंदीच्या काळात आलेले वीजेचे बील पाहता जनतेचे अर्धे बील माफ करावे या मागण्यांसंदर्भात मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना भेटण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाला व जिल्हाधिकारी, अमरावती यांना रितसर पत्र दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी दिले असता सन्माननीय सदस्य हे विदर्भ एक्सप्रेस या गाडीने रवाना होण्यासाठी बडनेरा येथे जाणार असतानाच पोलीस आयुक्त, अमरावती यांनी आकसबुद्धीने दिलेल्या आदेशावरून पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२, अमरावती शहरी यांनी सन्माननीय सदस्यांना अटक करून पोलीस आयुक्त कार्यालयात आणले व तेथे त्यांना व लोकसभा सदस्या श्रीमती नवनीत राणा यांना उशिरापर्यंत बसवून ठेवले. तसेच पोलीस आयुक्त, मुंबई यांनी दिलेल्या आदेशावरून वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खेरवाडी पोलीस स्टेशन, वांद्रे (पूर्व) यांनी अनावश्यकरीत्या फौजदारी दंड प्रक्रिया संहितेच्या कलम १४९ नुसार सन्माननीय सदस्य व लोकसभा सदस्या श्रीमती नवनीत राणा यांना नोटिसा काढल्या व त्यांना मुख्यमंत्री यांच्या भेटीसाठी प्रतिबंध आणल्यामुळे झालेला सन्माननीय विधानसभा सदस्य यांचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय.		सूचना मा. मुख्य सचिव यांच्याकडे चौकशी करण्यास्तव पाठविण्यात आली. दिनांक २२ डिसेंबर २०२० चौकशी अहवाल अप्राप्त.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
सन २०२१ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन					
१५.	३२	श्री. बालाजी कल्याणकर, वि.स.स. दिनांक ३ मार्च २०२१	श्री. अविनाश धोंडगे, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांच्याविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्य प्रतिनिधीत्व करत असलेल्या नांदेड (उत्तर) मतदारसंघात पुरहानी, दुरुस्ती फंड (एफ डीआर)मधील ३० कोटीचा पूल नांदेड डिव्हिजन मध्ये असतानाही भोकर डिविजन मध्ये टाकण्यात आला असून सदर कामाच्या उद्‌घटनाच्या फलकावर सन्माननीय सदस्यांचा नावाचा उल्लेख नव्हता. तसेच दिनांक २६ जानेवारी, २०२१ रोजी शासकीय विश्रामगृह व अधीक्षक अभियंता कार्यालय येथे आयोजित करण्यात आलेल्या उद्‌घटनाच्या कार्यक्रमाच्या फलकावर तसेच निमंत्रण पत्रिकेवर सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख न करता त्यांना कार्यक्रम सुरू होण्याअगोदर १० मिनिटापूर्वी आमंत्रित करण्यात आले. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या मतदार संघातील ३२ कोटीची पूलांची कामे मंजूर करून आणली असतानाही श्री. अविनाश धोंडगे, अधीक्षक अभियंता हे अंदाजपत्रक तयार करण्यास टाळाटाळा करीत असल्याने यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी त्यांना स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने विचारणा केली असता श्री. अविनाश धोंडगे, अधीक्षक अभियंता यांनी त्यांना उद्‌ध्टपणाने उत्तर दिल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय."	दिनांक ३ मार्च २०२१	श्री. अविनाश धोंडगे, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांचा खुलासा मागविण्यात आला.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१६.	३३	श्री हिरामण खोसकर, वि.स.स. दिनांक ४/३/२०२१	श्री. विवेक माळुंदे, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्य प्रतिनिधीत्व करीत असलेल्या त्र्यबंकेश्वर मतदारसंघात आंबोली जव्हार रस्त्याच्या कामाचे दिनांक ३० मे, २०२० रोजी भुमीपूजन करण्यात आले होते. तसेच घोटी-सिन्नर या शहरांना जोडणाऱ्या घोटी शहरात उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलाचे भुमीपूजन देखील दिनांक २० सप्टेंबर, २०२० रोजी आयोजित करण्यात आले होते. मात्र सदर दोन्ही कार्यक्रमास सन्माननीय सदस्य स्थानिक लोकप्रतिनिधी असूनही त्यांच्या नावाचा उद्घाटन फलकावर कोठेही उल्लेख न केल्याने तसेच कार्यक्रमास आंमत्रित न केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."	दिनांक ४ मार्च २०२१	प्रोसेस.
१७.	३४	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. दिनांक	श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्य यांनी दिनांक ४ मार्च, २०२१ रोजी श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय यांच्याकडे मुंबईत झालेल्या विजबत्ती गुल झाल्याप्रकरणी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल मिळण्याबाबत माहिती मागितली असता श्री. दिनेश वाघमारे यांनी सदर		श्री. दिनेश वाघमारे, प्रधान सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय यांचा खुलासा मागविण्यात आला.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			अहवाल सन्माननीय सदस्य यांना देण्यास स्पष्ट नकार दिला. श्री. दिनेश वाघमारे यांनी सन्माननीय सदस्य यांना विधिमंडळ लोकलेखा समितीचा समिती प्रमुख असतानाही सदर अहवाल न दिल्यामुळे झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय."		खुलासा प्राप्त.
१८.	३५	श्री. मोहन गोपाळ मते, वि.स.स. दिनांक ५ मार्च २०२१	श्री. धुर्वे, सहायक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर व श्री. पाणबुडे, कामगार आयुक्त, नागपूर यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन्माननीय सदस्य प्रतिनिधीत्व करित असलेल्या दक्षिण-नागपूर मतदारसंघात माथाडी कामगार व व्यावसायिक यांच्यातील तक्रारी सोडविण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी श्री. धुर्वे, सहायक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर यांना बैठकीचे आयोजन करण्यासंदर्भात दिनांक १७ ऑगस्ट, २०२० रोजीच्या पत्रान्वये निवेदन देवूनही तीन महिन्यांच्या कालावधीनंतर बैठकीचे आयोजन केल्याने तसेच कामगार आयुक्त, नागपूर यांनी सन्माननीय सदस्यांना बैठकीची वेळ न देता वारंवार अपमानास्पद वागणूक दिल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		प्रोसेस.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१९.	३७	श्री. वैभव नाईक, वि.स.स. दिनांक ८ मार्च २०२१	सचिव, वन विभाग, सहसचिव व प्रधान मुख्य वनसंरक्षक वन विभाग यांच्याविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "सन २०१६ ते २०१९ या चार वर्षांच्या कालावधीत वन विभागाने ५० कोटी वृक्षलागवडीसंदर्भात विधीमंडळाला खर्च सादर करताना रुपये २४३८ कोटी खर्च झाल्याचे नमूद केले. मात्र प्रत्यक्षात ५० कोटी वृक्षलागवडीसाठी महाराष्ट्र शासानाचे सुमारे ३६८८ कोटी रुपये खर्च झाले आहेत. विधीमंडळाला खर्च सादर करताना सुमारे १२५० कोटी रुपये आवर्ती व अनावर्ती खर्चाची रक्कम समाविष्ट न करता फक्त अंदाजपत्रकानुसार झालेल्या खर्चाचीच माहिती विधीमंडळाला सादर करण्यात आली असून ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाचा खर्चाची खोटी माहिती सादर करून वन विभागाचे सचिव, सहसचिव व प्रधान मुख्य वनसंरक्षक व सर्व जबाबदार अधिकारी यांनी विधीमंडळाची फसवणूक व दिशाभूल केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय."		प्रोसेस.
२०.	३८	श्री. देवेंद्र फडणवीस, मा. विरोधी पक्षनेते	मा.ना.श्री. अनिल देशमुख, गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचोविरुद्ध सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "दिनांक ९ मार्च, २०२१ रोजी विधानसभा सभागृहात विरोधी पक्षाकडून श्री. मनसुख हिरेन यांच्या मृत्युप्रकरणी पोलीस अधिकारी श्री. सचिन वाझे यांच्यावर कारवाई		

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
		महाराष्ट्र विधानसभा, दिनांक १० मार्च २०२१	करण्याची मागणी करण्यात आली असता मा.गृहमंत्री यांनी "श्री. अन्वय नाईक यांची हत्या झाली, त्याबाबतची तक्रार त्यांची पत्नी श्रीमती अक्षदा नाईक व मुलगी श्रीमती आज्ञा नाईक यांनी दिली असता मा.श्री. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री पदावर असताना श्री. अन्वय नाईक यांची केस त्यांनी दाबली" असे विधान करून सन्माननीय सदस्यांचा सभागृहाचे सदस्य यां नात्याने तसेच मा. विरोधी पक्षनेता या भूमिकेतून सरकारला जाब विचारण्याचे त्यांचे कर्तव्य पार पाडत असताना त्यामध्ये त्यांच्यावर दबाव टाकून अडथळा आणण्याचा व सन्माननीय सदस्य यांच्या भाषण स्वातंत्र्याच्या हक्कापासून त्यांना वंचित ठेवण्याचा प्रयत्न केल्याने सार्वभौम सभागृहाचा व मा. विरोधी पक्षनेता यांचा झालेला विशेषाधिकार भंग व अवमान हा होय."	दिनांक १० मार्च २०२१	मा.ना.श्री. अनिल देशमुख, गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचा खुलासा मागविण्यात आला.
२१.	३९	श्री. देवेंद्र फडणवीस, मा. विरोधी पक्षनेते महाराष्ट्र विधानसभा,	मा.ना.श्री. अशोक चव्हाण, सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, मराठा आरक्षण समिती यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "मराठा आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात दिनांक ८ मार्च, २०२१ पासून नियमितपणे सुनावणी घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. मा.सर्वोच्च न्यायालयापुढे झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने मा.ना.श्री. अशोक चव्हाण, सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य		मा.ना.श्री. अशोक चव्हाण, सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचा खुलासा

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
		दिनांक १० मार्च २०२१	तथा अध्यक्ष, मराठा आरक्षण समिती यांनी दिनांक १० मार्च, २०२१ रोजी सभागृहात निवेदन केले होते. सदर निवेदनामध्ये वस्तुस्थिती विषयी पूर्ण माहिती असतानाही मा.मंत्री महोदयांनी वस्तुस्थितीशी विसंगत विधाने करून सभागृहाची दिशाभूल केल्याने झालेला सभागृहाचा व सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय."		मागविण्यात आला. खुलासा प्राप्त.
२२.	४०	श्री. प्रदिप जैस्वाल, वि.स.स दिनांक २३ मार्च २०२१	श्री. आस्तिक कुमार पांडे, आयुक्त महारनगरपालिका, संभाजीनगर (औरंगाबाद) यांच्याविरुद्ध. सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे,"सन्माननीय सदस्य यांनी संभाजीनगर (औरंगाबाद) महानगरपालिकेतील आस्थापनेवर कार्यरत असलेल्या व रिक्त असलेल्या उप आयुक्त, सह-आयुक्त व इतर रिक्त असलेल्या पदाची माहिती मिळण्यासंदर्भत श्री. आस्तिक कुमार पांडे, आयुक्त, महानगरपालिका,संभाजीनगर (औरंगाबाद) यांना माहे जानेवारी, २०२० पासून दिनांक १७/०२/२०२० व दिनांक २४/०७/२०२० रोजी स्मरणपत्र देऊनही यासंदर्भातील माहितीचा तपशील सन्माननीय सदस्यांना प्राप्त झाला नाही तसेच दिनांक ०२/०१/२०२१ रोजी सन २०१२-२०१३ साली रस्ता रुंदिकरण मोहिमे अंतर्गत हटविण्यात आलेल्या बांधित मालमत्तेच्या जागेवर झालेले अतिक्रमण,दिनांक १९/०१/२०२१ रोजी		श्री. आस्तिक कुमार पांडे, आयुक्त महारनगरपालिका संभाजीनगर (औरंगाबाद) यांचा खुलासा मागविण्यासाठी प्रस्तावीत.

अ.क्र.	सूचना क्रमांक	सूचना देणारे सदस्य	सूचनेचा विषय	सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			संभाजीनगर (औरंगाबाद) मध्ये मतदार संघातील जटवाडा रोडवरील एकतानगर, वानखेडेनगर, व हसूर्ल, भगतसिंनगर, तसेच मयूरपार्क, सुरेवाडी, मिसारवाडी, पहाडसिंगपुरा, भावसिंगपुरा, शांतीपुरा, पेठेनगर, या भागातील मनपा मध्ये समाविष्ट झाल्यानंतर अंतिम मंजूर रेखांकन झालेले व १०० टक्के विकास निधी भरलेल्या नागरिकांच्या वसाहतीचे नावे व किती विकास शुक्ल कधी व किती भरले यांची सविस्तर माहिती, तसेच दिनांक १९/०१/२०२१ रोजी संभाजीनगर (औरंगाबाद) स्मार्ट सिटी डेव्हलमेंट कॉर्पोरेशन लि. अंतर्गत चालू झालेल्या कामाबाबत माहिती उपलब्ध करणेबाबत वारंवार पत्र व्यवहार करूनही श्री. आस्तिक कुमार पांडे, आयुक्त यांनी सन्माननीय सदस्यांना कोणतीच माहिती वा तपशील देण्यास हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकारभंग व अवमान हा होय."		
२३.	४१	श्री.महेश संभाजीराजे शिंदे, वि.स.स. दिनांक ५ मार्च २०२१	अतिरिक्त जिल्हाधिकारी, श्री. रामचंद्र शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी, श्री. थोरवे, जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्रीमती किर्ती नलवडे आणि सर्व उपविभागीय अधिकारी यांच्याविरुद्ध.	दिनांक ५ मार्च २०२१	सूचना कक्षास प्राप्त झाली नाही.

अहवाल सादर करण्यास्तव

विधानसभा विशेषाधिकार समितीकडे सूपुर्द करण्यात आलेली प्रकरणे.

अ.क्र.	सुचना क्रमांक	सुचना देणारे सदस्य	सुचनेचा विषय	सुचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
१	१३	श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. दिनांक ७ सप्टेंबर २०२०	श्री.अर्णब गोस्वामी, संपादक, वृत्त निवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक, रिपब्लिक टिव्ही वृत्तवाहिनी यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, श्री.अर्णब गोस्वामी, संपादक, वृत्त निवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक, रिपब्लिक टिव्ही वृत्तवाहिनी यांचेद्वारे अनेक कार्यक्रमांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून एका चित्रपट अभिनेत्याच्या आत्महत्या प्रकरणावरुन या वृत्तवाहिनीवर सातत्याने कपोलकल्पित चर्चा घडवून आणण्यात येत असून या चर्चेमध्ये या राज्याचे प्रमुख असलेले माननीय मुख्यमंत्री, श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचेवर अत्यंत आक्षेपार्ह, एकेरी व अश्लाघ्य भाषेत टिकाटीपणी करून मा.मुख्यमंत्री, मंत्रिमंडळाचे मंत्री, शासन यांचेबाबत जाणूनबुजून, हेतुपुरस्सर व दुष्टबुद्धीने अत्यंत आक्षेपार्ह व अवमानकारक विधाने करून. वृत्तपत्रीय पत्रकारितेच्या सर्व मर्यादा पायदळी तुडविण्यात येऊन वस्तुस्थितीदर्शक माहिती न घेता अत्यंत आक्षेपार्ह, मानहानीकारक व खोडसाळ वृत्त जाणीवपूर्वक प्रसारित करून महाराष्ट्रातील व देशातील जनतेच्या मनात एकूणच	दिनांक ७ सप्टेंबर २०२०	अहवाल सादर करण्यास्तव प्रकरण समितीकडे सूपुर्द करण्यात आले.

अ.क्र.	सुचना क्रमांक	सुचना देणारे सदस्य	सुचनेचा विषय	सुचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			मा.मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी मंत्री, व शासन यांचेबद्दल संशय निर्माण होईल, त्यांची बदनामी होईल, अशा प्रकारची वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न करून. माननीय मुख्यमंत्री ज्या विधानमंडळाचा भाग आहेत त्या विधानमंडळावरच अप्रत्यक्षपणे तसेच मंत्रिमंडळावर देखील प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे अत्यंत अवमानकारक, आक्षेपार्ह व असत्य टिकाटीपणी व निराधार आरोप करून मुख्यमंत्र्यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सभागृहाचे कामकाज पार पाडण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करून विधानमंडळाचा, सभागृहाचा, व सभागृहाचे सदस्य असलेल्या मा.मुख्यमंत्री यांचा केलेला विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.		
२	१५	श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. दिनांक ७ सप्टेंबर २०२०	हिंदी सिने अभिनेत्री कंगना राणावत यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "हिंदी सिने अभिनेत्री कंगना राणावत यांनी मुंबई बद्ल अत्यंत मानहानीकारक वक्तव्य करून मुंबई पाक व्याप्त काश्मीरसारखी वाटते असे बेताल वक्तव्य ट्वीटद्वारे करून त्याद्वारे मुंबईसाठी बलीदान केलेल्या १०८ हुतात्म्यांचा अपमान करून संपूर्ण महाराष्ट्राचा अवमान केल्याने झालेला विशेषाधिकार भंग व अवमान हा होय."		अहवाल सादर करण्यास्तव प्रकरण समितीकडे सुपूर्द करण्यात आले.

२०२० चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन व त्यानंतर नाकारलेल्या सूचनांचे विवरणपत्र

अ.क्र.	सुचना क्रमांक	सुचना देणारे सदस्य	सुचनेचा विषय	सुचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२	२१	श्री.महेंद्र हरि दळवी, वि.स.स. दिनांक २ नोव्हेंबर २०२०	श्रीमती शारदा पोवार, उपविभागीय अधिकारी अलिबाग, जिल्हा रायगड यांच्याविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "अलिबाग ता.रायगड येथे माहे जून, २०२० मध्ये आलेल्या निसर्ग चक्री वादळात नुकसान झालेल्या नुकसान ग्रस्तांच्या घरांचे, बागायतींचे व शेतीचे तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले होते. मात्र, उप विभागीय अधिकारी यांनी पक्षपातीचे धोरण स्विकारुन काही नुकसान ग्रस्तांना जाणूनबुजून शासनाच्या आर्थिक मदतीपासून वंचित ठेवले. त्याविरोधात नुकसानग्रस्तांनी तसेच स्थानिक नागरिकांनी उप विभागीय अधिकारी यांच्या मनमानी कारभाराविरोधात लोकप्रतिनिधींकडे अनेक तक्रारी दिल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी श्रीमती पोवार यांची तात्काळ बदली करण्याची मागणी मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली होती. स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी मंत्री महोदयांनी तात्काळ मान्य करून संबंधित अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली होती मात्र, संबंधित अधिकारी श्रीमती पोवार ह्या करण्यात आलेल्या बदलीच्या विरोधात मॅट मध्ये जाऊन बदलीला स्थगिती मिळविली होती.तसेच श्रीमती पोवार"		अनुमती नाकारली. दिनांक ११ फेब्रुवारी २०२१

अ.क्र.	सुचना क्रमांक	सुचना देणारे सदस्य	सुचनेचा विषय	सुचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			यांनी मॅट मध्ये दाखल केलेल्या याचिकेमध्ये सन्माननीय सदस्यांनी बदली केल्याचा आरोप करून त्याबाबत वृत्तपत्रात सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख करून बातमी प्रसिद्ध केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.		
२	२६	श्री.प्रताप सरनाईक, वि.स.स. दिनांक	पुण्य नगरी, पुढारी, नवाकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, दिव्य मराठी वृत्तपत्रे तसेच न्यूज ऑफ इंडिया, सी.एन.एन. न्यूज १८, न्यूज १८ लोकमत, एबीपी माझा या वृत्तवाहिनी यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, सन्माननीय सदस्य यांच्यावर दिनांक २४ नोव्हेंबर २०२० रोजी अंमलबजावणी संचालनालय (इडी) च्या अधिकाऱ्यांनी मुंबई व ठाणे येथील घरावर तसेच राजकीय व व्यावसायिक कार्यालयांवर छापा टाकून काही कागदपत्रे ताब्यात घेतली तसेच सन्माननीय सदस्या यांना व त्यांच्या मुलाला चौकशी साठी समन्स बजावले होते त्यावर हिंदी सिनेअभिनेत्री कंगणा राणावत यांनी सन्माननीय सदस्य यांच्या निवासस्थानावरून "पाकिस्तानी क्रेडीटकार्ड जप्त" अशा आशयाची खोटी बातमी ट्विट केल्यावर दिनांक १२ व १३ डिसेंबर २०२० रोजी काही वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक मिडिया व इंटरनेटच्या माध्यमातून सोशल मिडियामध्ये "ईडीच्या छाप्यादरम्यान श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स.	दिनांक १५ डिसेंबर २०२०	अनुमती नाकारली. दिनांक ३ मार्च २०२१

अ.क्र.	सुचना क्रमांक	सुचना देणारे सदस्य	सुचनेचा विषय	सुचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			यांच्या निवासस्थानी पाकिस्तानी क्रेडीट कार्ड सापडल्याच्या खोट्या बातम्या कुठलाही ठोस पुरावा नसताना किंवा ईडीच्या अधिकाऱ्यांनी अधिकृतरित्या काही माहिती दिली नसताना देखील प्रसिद्ध केल्याने तसेच विविध न्यूज चॅनेलच्या माध्यमातून प्रसारीत केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय."		
३	२९	श्रीमती मेघना साकोरे - बोर्डीकर, वि.स.स. दिनांक ४ फेब्रुवारी २१	मा.ना.श्री. हसन मुश्रीफ, ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याविरुद्ध सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील वरुड ते जोगवाडा या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने संबंधित रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत सन २०२० च्या पावसाळी सत्रात सन्माननीय सदस्या यांनी तारांकित प्रश्न (प्रश्न क्र.११६४४, दि. १७/७/२०२०) उपस्थित केला होता. सदर प्रश्नाच्या उत्तरात मा.ग्रामविकास मंत्री महोदयांनी असे नमूद केले होते की, "सदर रस्ता हा काळ्या मातीच्या भागातून जात असल्याने तसेच वरुड (नृ) गावात खदान असल्याने प्रामुख्याने खदानाची वाहनांमुळे सदर रस्त्यावर खड्डे पडले आहेत. " मात्र सदर प्रकरणात स्थानिक चौकशी करून सादर केलेल्या संयुक्त पंचनामा व अहवालानुसार मौजे वरुड (नृ) येथील दगडाची खदान अंदाजे १० ते १२ वर्षापासून बंद आहे असे मा.तहसिलदार, जिंतूर यांनी सन्माननीय सदस्या यांना पाठविलेल्या दि. ३१/१२/२०२० रोजीच्या पत्रात नमूद केले. त्यामुळे मा. ना. श्री. हसन मुश्रीफ,		अनुमती नाकारली. दिनांक २५ फेब्रुवारी २०२१

अ.क्र.	सुचना क्रमांक	सुचना देणारे सदस्य	सुचनेचा विषय	सुचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			ग्रामविकास मंत्री यांनी सभागृहास दिलेले प्रश्नाचे उत्तर व प्रश्नांकित विषयाबाबतीत मा. तहसिलदार, जिंतूर यांनी स्पष्ट केलेली तेथील सद्यःस्थिती यामध्ये सकृत दर्शनी तफावत असल्याने मा.मंत्री यांनी खोटे उत्तर सादर करून सभागृहाची व सन्माननीय सदस्या यांची दिशाभूल केल्यामुळे झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार व अवमान हा होय.		
	३०	श्री. किसन कंथोरे वि.स.स. दिनांक १ मार्च २०२१	श्रीमती मनिषा पालांडे, अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " श्रीमती मनिषा पालांडे, अधीक्षक अभियंता, यांनी अंबरनाथ व बदलापूर या शहरातील नळजोडण्या तीन वर्षा करीता बंद केल्यामुळे उक्त दोन्ही शहरात कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाल्याने यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी तत्कालीन सदस्य सचिव यांना पत्र देऊन नळजोडण्या चालू करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुषंगाने सदस्य सचिव यांनी कार्यवाही करण्याबाबत श्रीमती पालांडे यांना कळविलेले असतानाही त्यांनी नळजोडण्या संदर्भात कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच श्रीमती मनिषा पालांडे, यांनी दोन्ही शहरातील पाणीपुरवठा करणारे पंपींग कमी केल्याने पाणी टंचाईची समस्या निर्माण झाल्याचे सन्माननीय सदस्य यांनी तत्कालीन पाणीपुरवठा मा. मंत्री व मा. राज्य मंत्री यांना बैठकित कळविले व तत्कालीन राज्य मंत्री यांनी पंपींग चालू ठेवण्याच्या सुचना दिल्यानंतरही श्रीमती पालांडे यांनी कार्यवाही केली नाही. या परिस्थितीत सन्माननीय सदस्य, स्थानिक लोकप्रतिनिधी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अभियंते व कर्मचारी		अनुमती नाकारली दिनांक ७ एप्रिल २०२१ मा. मुख्य सचिव यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सूचना पाठविण्यात आली. दिनांक ७ एप्रिल २०२१.

अ.क्र.	सुचना क्रमांक	सुचना देणारे सदस्य	सुचनेचा विषय	सुचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			यांनी केलेल्या मागणीनुसार श्रीमंती पालांडे यांच्याकडे असलेला प्रभारी मुख्य अभियंत्याचा कार्यभार काढण्यात आल्यानंतर त्यांनी पत्रकारांना लिहिलेल्या प्रेस नोट मध्ये सन्माननीय सदस्य त्यांना नाहक त्रास देत असल्याचा उल्लेख करून सन्माननीय सदस्यांच्या हक्कावर गदा आणून बदनामी केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय."		
	३१	श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. दिनांक ३ मार्च २०२१.	मा. ना. श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजन मंत्री यांचेविरुद्ध सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे "वैधानिक विकास मंडळासंदर्भात दिनांक २६ जुलै, १९८४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. वसंतदादा पाटील यांनी वैधानिक प्रस्ताव विधानसभा तसेच विधानपरिषदेत सादर केला, त्यान्वये माहे सप्टेंबर, १९८४ मध्ये करार करण्यात आला आणि १९५६ च्या राज्य पुनर्रचनेचा कायदा तयार करत असताना संविधानाच्या ३७१ (२) या अनुच्छेदानुसार विदर्भ व मराठवाडा तसेच उत्तर महाराष्ट्रासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्यासाठी मान्यता देण्यात आली. मात्र दिनांक ३० एप्रिल,	४ मार्च २०२१	अनुमती नाकारली २४ मार्च २०२१.

अ.क्र.	सुचना क्रमांक	सुचना देणारे सदस्य	सुचनेचा विषय	सुचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			२०२० रोजी वैधानिक विकास मंडळाची मुदत संपलेली असतानाही या मंडळांची पुन्हा स्थापना राज्य शासनाने केली नसल्याने निधीचे समन्यायी वाटप व समतोल विकास या उद्दीष्टांना हरताळ फासला जाण्याची शक्यता निर्माण होऊन पर्यायाने विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रावर निधी वितरणासंदर्भात अन्याय होण्याची शक्यता निर्माण झाल्याने मा.अर्थ व नियोजन मंत्री यांचेद्वारे झालेला सार्वभौम सभागृहाचा विशेषाधिकार भंग हा होय."		
	३६	श्री. विक्रमसिंह सावंत, वि.स.स. दिनांक ८ मार्च २०२१.	श्री. विजयकुमार नामद, सरपंच ग्रामपंचायत उमराणी, श्री. संजय शिंदे, उपसरपंच ग्रामपंचायत उमराणी, श्री. प्रकाश जमदाडे, संचालक, रेल्वे बोर्ड , पुणे विभाग, श्री. अमोल डफळे,OSD जलसंपदा मंत्री स्विसहाय्यक, श्री. शेख साहेब, उप अभियंता (इ व द) पंचायात समिती, जत यांच्याविरुद्ध सुचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, दिनांक ४ मार्च २०२१ रोजी सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील मौजे. उमराणी येथे ग्रामपंचायत, मौजे. उमराणी यांच्यामार्फत आयोजित करण्यात आलेल्या नुतन पशुवैद्यकीय दवाखाना इमारत श्रेणी -१) च्या	५ मार्च २०२१	अनुमती नाकारली दिनांक २५ मार्च २०२१ मा. मुख्य सचिव यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सूचना पाठविण्यात आली. दिनांक ५ मार्च, २०२१.

अ.क्र.	सुचना क्रमांक	सुचना देणारे सदस्य	सुचनेचा विषय	सुचना सभागृहात मांडल्याचा दिनांक	सद्यःस्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
			इमारतीच्या पायाभरणीच्या समारंभास सन्माननीय सदस्यांना स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून निमंत्रित करण्यात आले नाही तसेच त्यांचे नाव कार्यक्रम पत्रिकेवर छापण्यात आले नसल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकार भंग व अवमान हा होय.		

विवरण क्रमांक - ४२

सांविधिक प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९० अन्वये)

निरंक

विवरण क्रमांक - ४३

अंतिम आठवडा प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९२ अन्वये)

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
१	सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड आशिष शेलार, सर्वश्री गिरीष महाजन, हरिभाऊ बागडे, डॉ.संजय कुटे, सर्वश्री जयकुमार रावल, संभाजी पाटील-निलंगेकर, नितेश राणे, अतुल भातखळकर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री गणेश नाईक, कालिदास कोळंबकर, योगेश सागर, सुभाष देशमुख, मंगलप्रभात लोढा, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री राम कदम, सुनिल राणे, सर्वश्रीमती श्वेता महाले, देवयानी फरांदे, मनिषा चौधरी, सर्वश्री	" कोरडवाहू पिकांसाठी हेक्टरी रुपये २५,००० व बागायती पिकांसाठी हेक्टरी रुपये ५०,००० मदत देण्याच्या घोषणा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन दिल्यानंतर प्रत्यक्षात मात्र महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांचा पूर्णपणे भ्रमनिरास केलेला असणे, महात्मा फुले कर्जमाफी योजनेमध्ये देण्यात आलेल्या कर्जमाफीपासून राज्यातील अनेक पात्र शेतकरी अद्यापही वंचित असणे, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देण्याची सरकारची घोषणा हवेतच विरलेली असणे, कोरोना संकटाचा फटका समाजातील अन्य घटकांबरोबरच शेतकऱ्यांनाही बसलेला असणे, अशातच अवकाळी पाऊस व गारपिटीने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले असणे, माहे फेब्रुवारी ते मे, २०२० या कालावधीतील गारपीटीसाठी दिलेली नुकसान भरपाई अत्यंत विलंबाने व तुटपुंजी असणे, शेतकऱ्यांचा मागील वर्षाचा खरीप हंगाम ऐन भरात असताना अतिवृष्टी व त्यानंतर मावा, तुडतुडा या रोगांनी पिकावर आक्रमण केलेले असणे, बोंडअळी व बोंडसडीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे आत्यंतिक नुकसान झालेले असणे, याची कोणतीच नुकसानभरपाई शेतकऱ्यांना अद्यापही मिळालेली नसणे, शेतमालाला भाव मिळत नसणे, कापूस, तूर खरेदी केंद्रे सुरू करण्यात होत असलेला विलंब, पीक कर्जे देण्यास बँका टाळाटाळ करत असणे,	दिनांक ९ व १० मार्च, २०२१ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	रणधीर सावरकर, राणाजगजितसिंग पाटील, डॉ. राहुल आहेर, सर्वश्री समीर कुणावार, मोहन मते, डॉ. देवराव होळी, श्री समीर मेघे, डॉ. भारती लव्हेकर, श्री अमित साटम, सर्वश्रीमती सीमा हिरे, मोनिका राजळे, नमिता मुंदडा, श्री. राम सातपुते, श्रीमती विद्या ठाकूर, ॲड पराग अळवणी, सर्वश्री संजय केळकर, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, महेश लांडगे, लक्ष्मण जगताप, सुनिल कांबळे, अभिमन्यू पवार, सचिन कल्याण-शेट्टी, जयकुमार गोरे, शिवेंद्रसिंह भोसले, श्रीमती मंदा म्हात्रे, ॲड आकाश फुंडकर, सर्वश्री हरिष पिंपळे, दादाराव केचे, टेकचंद सावरकर, प्रा.डॉ. अशोक उईके, सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर,	प्रथम बोगस बियाणांमुळे करावी लागलेली दुबार पेरणी नंतर अतिवृष्टी व पिकांवर पडलेले रोग यामुळे शेतकऱ्यांचा खरीप हंगाम हातचा जाणे, ज्याअर्थी, खरिपाची ही तूट रब्बी हंगामात भरून काढण्याच्या बेतात शेतकरी असणे, त्यामुळे शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात गहू, हरभरा, तूर, वाटाणा, ज्वारी, लाखोरी, जवस यासारख्या कडधान्ययुक्त पिकांची लागवड केली असणे, त्याशिवाय फळपिके व भाजीपाला पिकांचीही लागवड केली असणे, मात्र अचानक वातावरणात बदल घडून येऊन अवकाळी पाऊस झाल्याने ही पिके धोक्यात आली असणे, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ पासून तीन ते चार दिवस राज्यात अवकाळी पाऊस बरसलेला असणे, मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्याच्या अनेक भागात सलग दोन दिवस गारपिटीसह पाऊस बरसलेला असणे, मध्य व पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पुणे या जिल्ह्यात काही ठिकाणी वादळी पावसासह गारांचा पाऊस पडणे, विदर्भातील नागपूर, अमरावती, बुलढाणा या जिल्ह्यातही अवकाळी पावसाने चांगलीच हजेरी लावणे, कोकणातही पावसाच्या सरी पडणे, या पावसामुळे शेतकऱ्यांच्या गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असणे, अनेक ठिकाणी पावसामुळे पिके आडवी पडल्याचे दिसून येत असणे, आंब्याचा मोहरही गळून पडलेला असणे, द्राक्षे, टरबूज, खरबूज या पिकांचेही नुकसान झालेले असणे, मागील वर्षी झालेल्या नुकसानभरपाईचे पैसे अद्यापही हाती येण्यास अवकाश असणे, अशा परिस्थितीत पुन्हा उद्‌भवलेल्या या अस्मानी संकटामुळे शेतकरी पुरता हवालदिल झालेला असणे, नुकसान भरपाईचे	

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	सर्वश्री किर्तीकुमार भांगडीया, मदन येरावार, नारायण कुचे, प्रशांत बंब, कॅप्ट. आर. तमिल सेल्वन, ॲड राहुल कुल, सर्वश्री सिद्धार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, नामदेव ससाणे, वि.स.स.	पंचनामे तातडीने करण्याबाबत शेतकऱ्यांकडून मागणी होत असणे, किमान यावेळी तरी शेतकऱ्याला प्रति हेक्टर त्वरित भरीव अर्थसहाय्य करण्याची गरज असणे, राज्यातील शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्याची व भरीव आर्थिक मदतीचा हात सरकारने पुढे करण्याची आवश्यकता, तसेच महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर ३०० युनिटपर्यंत मोफत विजेची घोषणा केली असली तरी त्याची अंमलबजावणी केलेली नसणे, कोरोना काळात आलेल्या वाढीव बिलात सवलत देण्याची घोषणा ऊर्जामंत्र्यांनी केलेली असणे, परंतु, त्याची अंमलबजावणी झालेली नसणे, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या कृषि पंपांना मोफत वीज, थकबाकी माफ करणे, अशा मागण्या सरकारकडे वारंवार केल्या गेल्या असल्या तरी सरकारने त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केलेले असणे, शेती पंपांसाठी पैसे भरुनही लाखो शेतकऱ्यांना विद्युत जोडणी मिळालेली नसणे, मागील काळात अचानकपणे वीज खंडित झाल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्र ठप्प झाला असणे, यामुळे कोट्यवधीचे नुकसान झालेले असणे, यामागे घातपाती कारवाई असावी असा संशय व्यक्त केला जाणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याबाबत आश्वासन सरकारने दिले असले तरी त्याबाबत कोणतीही उपाययोजना सरकारने केलेली नसणे, सोलर एनर्जी व विंड एनर्जी बाबत राज्याचे धोरण असले तरी या धोरणाची अंमलबजावणी झालेली नसणे, राज्यातील वीज क्षेत्रातील विविध प्रश्न, राज्य सरकारने याबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता विचारात घेण्यात यावी.”	

विवरण क्रमांक - ४४

अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेसंबंधातील अधिक माहिती

सभागृहासमोर ठेवणे

(म.वि.स. नियम २९२ अन्वये)

निरंक

विवरण क्रमांक ४५

सार्वजनिक हितसंबंधातील इतर बाबतीतील प्रस्ताव

(म.वि.स. नियम २९३ अन्वये)

(१) प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या - ०२

(२) मान्य सूचनांची संख्या - ०२

(३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - ०१

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	सर्वश्री सुनिल प्रभू, अनिल पाटील, सुरेश वरपुडकर, अजय चौधरी, प्रकाश सोळंके, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री प्रताप सरनाईक, दिपक चव्हाण, अमित झनक, राजन साळवी, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री अमीन पटेल, अनिल बाबर, ॲड अशोक पवार, सर्वश्री संग्राम थोपटे, चिमणराव पाटील, दिलीप बनकर, कैलास गोरंटयाल, संजय शिरसाट, रोहित पवार, कुणाल	"राज्यात सन २०१९ मध्ये सरकार स्थापन झाल्यानंतर, "कोरोना" नामक महासंकट उभे राहिले, या संकटावर मात करण्याकरिता शासनाने वैद्यकिय व तांत्रिक सहाय्य करण्यासाठी वरिष्ठ डॉक्टरांचे राज्य कृती दल स्थापन करून पुरेशा चाचणी प्रयोगशाळा, विशाल (जंबो) रुग्णालये (कोविड सेंटर) स्थापन करून तसेच राज्यातील नागरिकांना शिस्त व नियमांचे पालन करण्याचे आवाहन करून या रोगावर यशस्वीपणे मात केलेली असतांना शासनाने राज्याच्या विकासाच्या दृष्टीने अनेक निर्णय घेतले, अर्थव्यवस्थेचा प्रमुख घटक म्हणजे शेतकरी यांच्या उन्नतीकरिता स्मार्ट कृषि प्रकल्प उभारण्याकरिता उपसमिती गठीत करणे, शेतकरी संघटना आणि शासन चर्चेसाठी प्रथमच व्यासपीठाची उपलब्धता, शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्षाची स्थापना, शेतमजूरांना कौशल्य विकास आधारित प्रशिक्षण, कोरोनामुळे बाजारात पिशवीबंद दुधाच्या मागणीत घट झाल्याने दूध उत्पादकांना याचा फटका बसू नये याकरिता दुध	दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आला परंतु चर्चा झाली नाही.

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	पाटील, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री संदिप क्षीरसागर, सुभाष धोटे, संजय रायमूलकर, शेखर निकम, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सुनिल शेळके, माधवराव जवळगावकर-पाटील, दौलत दरोडा, रावसाहेब अंतापुरकर, ॲड. माणिकराव कोकाटे, सर्वश्री पी.एन. पाटील (सडोलीकर), शिरीषकुमार नाईक, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री हिरामण खोसकर, संजय जगताप, विक्रमसिंह सावंत, धिरज देशमुख, वि.स.स.	भुकटी पॅकिंग करून अमृत आहार योजनेअंतर्गत वाटप, टाळेबंदीच्या कालावधीत मासे, मत्स्यबीज व मस्त्यखाद्याचा समावेश अत्यावश्यक बाबीमध्ये करून वाहतूकीस परवानगी, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा विभागांतर्गत स्वच्छाग्रहीच्या नियुक्तीस एक वर्षाची मुदतवाढ, शाळा बंद ... पण शिक्षण या अंतर्गत "दीक्षा ॲप आधारित विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन, गुगलच्या सहकार्याने गुगल क्लासरुम उपक्रम राबविणारे देशातील पहिले राज्य, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनातील राष्ट्रीय भावना जागृत ठेवण्याच्या दृष्टीने विद्यापीठ आणि महाविद्यालयाची दैनंदिन सुरूवात राष्ट्रगीताने करण्याचा निर्णय, "मराठी भाषा गौरव दिन" महाविद्यालयांमध्ये साजरा करण्याचा निर्णय, ग्रंथालयांची नव्याने पडताळणी करण्याचा निर्णय, संशोधन, प्रशिक्षण व कौशल्य विकास यामधील गुणवत्ता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिडा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय, टाळेबंदीच्या काळात अडकलेल्या आदिवासी मजूरांना मूळ गावी पाठविण्यासाठी घेतलेला पुढाकार, राज्यातील ६५ हजार उद्योगांना टाळेबंदीनंतर परवानगी, तसेच १६ लाख कामगारांना कामावर रूजू करून घेणे, महाजॉब्स पोर्टल आणि ॲप सुरू, स्थलांतरीत बेघर कामगारांना सुविधा देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापन करण्यास मान्यता, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांना दोन हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य, राज्यातील ज्या शेतकऱ्यांनी वेळेत कर्ज भरले आहेत त्यांना तीन लाखपर्यंत कर्ज विनाव्याज देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, यासारखे अनेक महत्वाचे निर्णय घेऊन कोरोना काळातही राज्याची आर्थिक स्थिती, वैद्यकिय स्थिती आणि सुव्यवस्था यांचा	

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		योग्य समतोल राखण्याकरिता राज्य शासनाने वेळोवेळी घेतलेले योग्य निर्णय व त्यांची ठोसपणे केलेली अंमलबजावणी, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."	
	सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड.आशिष शेलार, डॉ.संजय कुटे, सर्वश्री रवि राणा, संभाजी पाटील-निलंगेकर, अतुल भातखळकर, राम कदम, गणेश नाईक, नितेश राणे, जयकुमार रावल, गिरीष महाजन, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री समीर कुणावार, बबनराव लोणीकर, सुनील राणे, हरीभाऊ बागडे, अभिमन्यु पवार, सचिन कल्याणशेट्टी, शिवेंद्रसिंह भोसले, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड पराग अळवणी, सर्वश्री मंगलप्रभात लोढा, रणधीर सावरकर, मोहन	"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, पुणे येथे पुजा चव्हाण आत्महत्या प्रकरणी संशयित मंत्र्यांचा राजीनामा घेतला असला तरी तो तीन दिवसांनंतरही राज्यपालांकडे पाठविलेला नसल्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम, या प्रकरणी २४ दिवसांचा कालावधी होऊनही गुन्हा दाखल झालेला नसून तपासाबाबत राज्यातील जनतेला अंधारात ठेवले असणे, पारदर्शक पद्धतीने तपास होण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेकडे तपास देण्याची आवश्यकता, ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यात झालेली वाढ, डान्सबारला आळा घालण्यात आलेले अपयश, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, पोलीसांवर पडणारा ताण, पुणे, नागपूर, नाशिक या सारख्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफियांकडून, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांकडून, शासकीय अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले व जीवे मारण्याच्या धमक्या, कोरोना काळात पोलीसांवर झालेले हल्ले, सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यांना मिळालेले मोकळे रान, सामाजिक अत्याचारात झालेली वाढ, महान कलाकारांची गुप्तहेरांमार्फत चौकशी करण्याचा सरकारने घेतलेला घृणास्पद निर्णय, गुंडाराजचं होत असलेलं उदात्तीकरण,	दिनांक ४ व ५ मार्च, २०२१ रोजी चर्चा झाली परंतु मा. मंत्री महोदयांचे उत्तर झाले नाही.

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
	मते, संतोष दानवे, प्रशांत बंब, अमित साटम, सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड राहुल कुल, सर्वश्री सिद्धार्थ शिरोळे, जयकुमार गोरे, वि.स.स.	राज्यावर घातपाती कारवायांचे असलेले गंभीर सावट, जातीय हिंसाचारात झालेली वाढ, जातपंचायतीच्या अत्याचाराच्या समोर आलेल्या घटना, तसेच, मुंबईतील अनेक मोठ्या व जनउपयोगी प्रकल्पांचे रखडलेले काम, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचार व अनियमिततेची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची रखडलेली कामे, मुंबईच्या विविध समस्यांनी धारण केलेले उग्र स्वरुप, मुंबईतील रखडलेली विकास कामे, महानगरपालिकेने गेल्या १० वर्षात केलेला खर्च, याबाबत श्वेतपत्रिका जाहीर करण्याची होत असलेली मागणी, मुंबईतील मेट्रोची कारशेड कांजूरमार्गलाच करण्याबाबत सरकारने धरलेला दुराग्रह त्यातून मेट्रोला होणारा विलंब व मुंबईकरांचे होणारे नुकसान, कोस्टल रोडच्या कामामुळे मच्छीमारांचे निर्माण झालेले प्रश्न, धारावी पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्यात होत असलेला विलंब, उपकर प्राप्त इमारतींचा प्रश्न, देवनार डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न, बीडीडी चाळींच्या पुनर्विकासातील समस्या यासारख्या मुंबईच्या समस्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन, सेस इमारतींचा प्रश्न, पुनर्बांधणी, स्वयंपुनर्बांधणी, परवडणारी घरे, भाडयाची घरे, महाकाय प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्यांच्या समस्या, मास हाऊसिंग सारखे प्रश्न व त्याबाबतच्या उपाययोजनांमध्ये निर्माण झालेल्या समस्या, तसेच कोरोना प्रादुर्भाव व मृत्यूची संख्या देशपातळीवर महाराष्ट्रात सर्वाधिक, कोरोना उपाययोजनात झालेला भ्रष्टाचार, टाळेबंदीमुळे अडचणीत आलेल्यांना सरकारने पॅकेजेस देण्यात केलेली कुचराई, सत्तारुढ पक्षाच्या नेत्यांकडून कोरोना नियमांचे झालेले उल्लंघन, कोरोना हाताळण्यात सरकारला आलेले अपयश, तसेच राज्यातील	

अ.क्र.	सदस्यांचे नांव	विषय	चर्चा झाल्याचा दिनांक
(१)	(२)	(३)	(४)
		विविध विभागांचा संतुलित विकास करण्यात व टाळेबंदी शिथिलीकरणानंतर या विभागांचे अर्थचक्र सुरळीत करण्यात सरकारला आलेले अपयश, राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, मराठा, धनगर, आर्थिकदृष्टया मागास यांच्यासाठीच्या योजना राबवण्यात, त्याचा लाभ देण्यात सरकारला आलेले अपयश, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.”	

विवरण क्रमांक ४६

नियम २९३ अन्वये सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबीवर चर्चेबाबत अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

निरंक

विवरण क्रमांक - ४७

श्वेतपत्रिका सभागृहाच्या पटलावर ठेवणे

निरंक

विवरण क्रमांक - ४८

मत विभाजन

निरंक

विवरण क्रमांक - ४९

महाराष्ट्र विधानसभा

प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२१

तारांकित / अतारांकित / अल्पसूचना प्रश्न व प्रश्नातून उद्‌भवलेल्या

अर्धा - तास चर्चा यावरील कार्यवाहीचे विवरणपत्र

(दिनांक १ मार्च, २०२१ ते १० मार्च, २०२१)

तारांकि त प्रश्न

(१)	(२)	(३)
१.	तारांकित प्रश्नांच्या प्राप्त झालेल्या सूचना	६६८६
२.	कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न	२७०८
३.	स्वीकृत झालेले तारांकित प्रश्न	३४८
४.	सभागृहात तोंडी उत्तरीत झालेले तारांकित प्रश्न	२९
५.	तारांकित प्रश्नातील अतारांकित करण्यात आलेले प्रश्न	--
६.	अस्वीकृत केलेले तारांकित प्रश्न	४७६
७.	विभागास / मा.सदस्यांना खुलासा विचारलेले तारांकित प्रश्न	--
८.	व्यपगत	१४०३
९.	साम्मिलीत तारांकित प्रश्न	४७८
१०.	मा.सदस्यांनी मागे घेतलेले प्रश्न	०३
११.	जादा तारांकित प्रश्न	३९७८

अल्पसूचना प्रश्न

(१)	(२)	(३)
१.	प्राप्त झालेले एकूण अल्पसूचना प्रश्न	--
२.	कार्यवाहीत घेतलेल्या अल्पसूचना प्रश्न	--
३.	स्वीकृत झालेल्या अल्पसूचना	--
४.	उत्तरीत झालेले अल्पसूचना प्रश्न	--
५.	अस्वीकृत केलेले अल्पसूचना प्रश्न	--
६.	विभागास खुलासा विचारलेले अल्पसूचना प्रश्न	--
७.	साम्मिलीत अल्पसूचना प्रश्न	--

तारांकित प्रश्नाच्या उत्तरातून उद्‌भवलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना

(१)	(२)	(३)
१.	प्राप्त झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या एकूण सूचना	३४
२.	मान्य झालेल्या सूचना	--
३.	गत सत्रातील प्रलंबित अर्धा-तास सूचना	--
४.	चर्चा झालेल्या सूचना	--
५.	सदस्य अनुपस्थितीमुळे चर्चा न झालेल्या सूचना	--
६.	सदस्यत्व स्थगितीमुळे चर्चा न झालेल्या सूचना	--
७.	बॅलेट मध्ये आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना	--
८.	विद्यमान सत्रातील प्रलंबित अर्धा-तास चर्चेच्या सूचना	--
९.	अस्वीकृत झालेल्या सूचना	--
१०.	सदस्यत्व स्थगित केल्यामुळे कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना	--
११.	व्यपगत झालेल्या सूचना	३४

मूळ अतारांकित प्रश्न

(१)	(२)	(३)
१.	या सत्रात आलेल्या मूळ अतारांकित प्रश्न सूचनांची संख्या	८४
२.	स्वीकृत झालेले प्रश्न	३७
३.	अस्वीकृत प्रश्न	३१
४.	विभागास/ मा.सदस्यांना खुलासा विचारलेले प्रश्न	७
५.	साम्मिलीत प्रश्न	९
६.	कार्यवाही सुरू असलेले प्रश्न	--
७.	उत्तरीत झालेल्या प्रश्नांची संख्या (अता. यादी क्र. ४२ ते ५६) (मागील सत्रातील स्वीकृत प्रश्नासह)	७५०

विवरण क्रमांक – ५०

तारांकित व अतारांकित प्रश्नासंबंधी माहिती

अ.क्र	प्रश्न	तारांकित	अतारांकित		एकूण
			मूळ अतारांकित	तारांकित स्वीकृत प्रश्नातून वेळेअभावी झालेले अतारांकित प्रश्न	
(१)	(२)	(३)	(४)		(५)
१	प्राप्त झालेल्या सूचना	६६८६	८४	--	६७७० (६६८६+८४)
२	स्वीकृत	३४८	३७	३१९	७०४ (३४८+ ३७+ ३१९)
३	व्यपगत	१४०३	--	--	१४०३
४	अतारांकित स्वीकृत	--	--	--	--
५	अस्वीकृत	४७६	३१	--	५०७ (४७६+३१)
६	सम्मिलीत, स्वीकृत व्यपगत, जादा प्रश्न विभागाकडे निर्देशित केलेले व सदस्यांनी मागे घेतलेले इत्यादी	५८६२ (४७८+ १४०३ + ३९७८+ ०३)	१६ (९+७)	--	५८७८ (५८६२+१६)
७	प्रश्न तोंडी उत्तरित	२९	--	--	२९

विवरण क्रमांक - ५१

तारांकित प्रश्नांची विभाग निहाय सांख्यिकीय माहिती

विभाग	आलेले प्रश्न	कार्य-वाहीत घेतलेले प्रश्न	जादा प्रश्न	सम्मि-लीत	अ-स्वीकृत	अतारां-कित स्वीकृत	विभाग / सदस्या-कडे निर्देशित केलेले	तारांकित स्वीकृत	तोडी उत्तरीत	सदस्य अनु-पस्थिती मुळे झालेले अतारांकित	वेळे अभावी अतारां-कित	मागे घेतलेले	तारांकित व्यपगत	तोंडी उत्तराच्या शेकडा प्रमाण	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)	(१५)	(१६)
सामान्य प्रशासन (माजी सैनिकांचे कल्याण), राजशिष्टाचार	८५	४८	३७	९	१५	--	--	३	--	--	३	--	२१	--	
गृह (परिवहन, बंदरे व राज्य उत्पादन शुल्क)	८५२	३१२	५४०	६१	३७	--	--	२८	२	--	२६	--	१८६	७.१४%	
महसूल व वन (पुनवर्सन व मदत कार्य, भुकंप पुनर्वसन आपत्ती व्यपस्थापन)	५८७	२७९	३०८	२१	७५	--	--	३०	१	--	२९	--	१५३	३.३३%	
कृषि पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय (फलोत्पादन)	३३८	११०	२२८	३४	१५	--	--	१७	१	--	१६	--	४४	५.८८%	
शालेय शिक्षण व क्रीडा	२९०	१०५	१८५	१७	२	--	--	१५	--	--	१५	--	७१		

विभाग	आलेले प्रश्न	कार्य-वाहीत घेतलेले प्रश्न	जादा प्रश्न	सम्मि-लीत	अ-स्वीकृत	अतारां-कित स्वीकृत	विभाग / सदस्या-कडे निर्देशित केलेले	तारांकित स्वीकृत	तोडी उत्तरीत	सदस्य अनु-पस्थिती मुळे झालेले अतारांकित	वेळे अभावी अतारां-कित	मागे घेतलेले	तारांकित व्यपगत	तोंडी उत्तराच्या शेकडा प्रमाण	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)	(१५)	(१६)
नगरविकास	७९२	३३५	४५७	५९	४९	--	--	६०	५	--	५५	२	१६५	८.३३%	
वित्त व नियोजन	४६	१६	३०	३	१	--	--	--	--	---	--	--	१२		
सार्वजनिक बांधकाम	५६८	२५४	३१४	४७	३२	--	--	३३	२	--	३१	१	१४१	६.०६%	
जलसंपदा, लाभक्षेत्र व खारभूमी विकास	१६४	४५	११९	१	१४	--	--	७	१	--	६	--	२३	१४.२८%	
विधी व न्याय	२०	११	९	१	६	--	--	२	--	--	२	--	२		
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म, नविन व नवीकरणीय ऊर्जा	४२९	२५४	१७५	२७	७९	--	--	२१	४	--	१७	--	१२७	१९.०४%	
अन्न व औषध प्रशासन	५६	८	४८	--	--	--	--	१	--	--	१	--	७		
ग्रामविकास	२२८	६६	१६२	७	१४	--	--	१३	१	--	१२	--	३२	७.६९%	
मृद व जलसंधारण	५५	२२	३३	०	१४	--	--	३	१	--	२	--	५	३३.३३%	
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण	१२५	४०	८५	४	१०	--	--	११	२	--	९	--	१५	१८.१८%	

विभाग	आलेले प्रश्न	कार्य-वाहीत घेतलेले प्रश्न	जादा प्रश्न	सम्मि-लीत	अ-स्वीकृत	अतारां-कित स्वीकृत	विभाग / सदस्या-कडे निर्देशित केलेले	तारांकित स्वीकृत	तोडी उत्तरीत	सदस्य अनु-पस्थिती मुळे झालेले अतारांकित	वेळे अभावी अतारां-कित	मागे घेतलेले	तारांकित व्यपगत	तोंडी उत्तराच्या शेकडा प्रमाण	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)	(१५)	(१६)
नियोजन (रोजगार हमी योजना)	५२	१९	३३	३	४	--	--	३	--	--	३	--	९		
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य	१३८	७९	५९	२०	१३	--	--	११	१	--	१०	--	३५	९.०९%	
संसदीय कार्य	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--		
गृहनिर्माण	२४८	९४	१५४	१२	१	--	--	१९	१	--	१८	--	६२	५.२६%	
पाणीपुरवठा व स्वच्छता	७२	२७	४५	६	६	--	--	५	१	--	४	--	१०	२०.००%	
सार्वजनिक आरोग्य	५१०	१७०	३४०	७०	१६	--	--	२०	४	--	१६	--	६४	२०.००%	
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये	१५३	५३	१००	२३	२	--	--	३	--	--	३	--	२५		
आदिवासी विकास	९१	४८	४३	३	२४	--	--	९	--	--	९	--	१२		
पर्यावरण	१२०	३८	८२	१०	२	--	--	८	--	--	८	--	१८		
सहकार, पणन व वस्त्रोद्योग	१५३	७८	७५	१६	१७	--	--	८	१	--	७	--	३७	१२.५०%	
उच्च व तंत्र शिक्षण	१८१	८७	९४	६	९	--	--	८	--	--	८	--	६४		
महिला व बाल विकास	८९	२०	६९	५	३	--	--	३	१	--	२	--	९	३३.३३%	

विभाग	आलेले प्रश्न	कार्य-वाहीत घेतलेले प्रश्न	जादा प्रश्न	सम्मि-लीत	अ-स्वीकृत	अतारां-कित स्वीकृत	विभाग / सदस्या-कडे निर्देशित केलेले	तारांकित स्वीकृत	तोडी उत्तरीत	सदस्य अनु-पस्थिती मुळे झालेले अतारांकित	वेळे अभावी अतारां-कित	मागे घेतलेले	तारांकित व्यपगत	तोंडी उत्तराच्या शेकडा प्रमाण	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)	(११)	(१२)	(१३)	(१४)	(१५)	(१६)
कौशल्य, रोजगार व उद्योजकता	२६	९	१७	--	१	--	--	१	--	--	१	--	७		
पर्यटन व सांस्कृतिक कार्य	१४७	४४	१०३	११	३	--	--	४	--	--	४	--	२६		
अल्पसंख्याक विकास, औकाफ	२१	५	१६	--	--	--	--	--	--	--	--	--	५		
मराठी भाषा	५	२	३	--	२	--	--	--	--	--	--	--	--		
इतर मागास बहुजन कल्याण	२०	९	११	--	७	--	--	१	--	--	१	--	१		
विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण	२५	२१	४	२	३	--	--	१	--	--	१	--	१५		
युवक कल्याण															
